रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १६ ◆ अंक ३२२
www.ramprahar.com
राम प्रहर
रविवार, ९ जून २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका लवकरच/२
कर्जत-नेरळ रस्त्यावरील सहा दुकाने चोरट्यांनी फोडली/५
युग म्हात्रेची राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेत चमक/८

## टी-२० वर्ल्डकपमध्ये आज भारत वि. पाकिस्तान लढत

**न्यूयॉर्क :** ज्या लढतीची संपूर्ण जगाला प्रतीक्षा असते ती भारत विरुद्ध पाकिस्तान या दोन संघातील क्रिकेट लढत रविवारी (दि. ९) न्यूयॉर्कमध्ये टी-२० वर्ल्डकपमध्ये होणार आहे. न्यूयॉर्कच्या ज्या नसाउ काउंटी इंटरनॅशनल स्टेडियमवर ही लढत होत आहे तेथे ड्रॉप-इन पिचचा वापर केला जात आहे, जे ऑस्ट्रेलियावरून मागवण्यात आले आहे. अशा प्रकारचे पिच सेट होण्यास एक वर्षाचा तरी कालावधी लागतो. त्यामुळे तातडीने तयार करण्यात आलेल्या या पीचवर टीका होत आहे. भारत विरुद्ध आयर्लंड सामन्यात चेंडू उसळी घेत होता आणि स्विंगदेखील अधिक पहायला मिळाला. त्यामुळे भारत-पाकिस्तान महामुकाबल्यात टॉसच बॉस होणार असे दिसते. उभय संघात टी-२० वर्ल्डकपमध्ये आजवर एकूण सात सामने झाले. त्यापैकी भारताने सहा, तर पाकिस्तानने केवळ एक जिंकलेला आहे.

# मोदी 3.0 : आज तिसऱ्यांदा घेणार पंतप्रधानपदाची शपथ

## एनडीएचे सरकार होणार स्थापन



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

लोकसभा निवडणुकीनंतर देशात पुन्हा एकदा एनडीए अर्थात राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार स्थापन होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी रविवारी (दि. ९) सायंकाळी ७.१५ वाजता ऐतिहासिक तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतील. राष्ट्रपती भवनात होणाऱ्या या सोहळ्यासाठी देश-विदेशांतील प्रमुख नेते, विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

शपथविधी सोहळ्यात श्रीलंकेचे अध्यक्ष रानिल विक्रमसिंघे, मालदीवचे राष्ट्रपती डॉ. मोहम्मद मुइज्जू, सेशेल्सचे उपाध्यक्ष अहमद अफिफ, बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना, मॉरिशसचे पंतप्रधान प्रविंद कुमार जगन्नाथ, नेपाळचे पंतप्रधान पुष्प कमल दहल प्रचंड, भूतानचे पंतप्रधान शेरिंग तोबगे आदी प्रमुख सहभागी होणार असल्याचे सांगितले जात आहे.

परदेशी पाहुण्यांसह देशातील वकील, डॉक्टर, कलाकार, सांस्कृतिक कलाकार आणि प्रभावशाली अशा विविध क्षेत्रांतील नामवंत व्यक्तीही एनडीए सरकारच्या शपथविधी सोहळ्याला हजर राहणार आहेत. यामध्ये विकसित भारताचे राजदूत, केंद्र सरकारच्या योजनांचे लाभार्थी, आदिवासी महिला आणि स्वच्छता कर्मचारी यांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे विविध धर्मातील सुमारे ५० प्रतिष्ठित धार्मिक नेत्यांनाही आमंत्रित करण्यात आले आहे.

शपथविधी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर दिल्लीत कडेकोट सुरक्षा व्यवस्था करण्यात आली आहे. राष्ट्रपती भवनाच्या सुरक्षेसाठी निमलष्करी दलाच्या पाच कंपन्या, नॅशनल सिक्युरिटी गार्ड कमांडो, ड्रोन आणि 'स्नायपर्स' तैनात करण्यात आले आहेत.

## महाराष्ट्रातून कुणाला मंत्रिपदाची संधी?

केंद्रातील एनडीए सरकारच्या नव्या मंत्रिमंडळात महाराष्ट्रातील काही खासदारांना स्थान मिळणार आहे. त्यातील पहिल्या खासदाराचे नाव निश्चित झाले झाले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादीचे राज्यसभा खासदार प्रफुल्ल पटेल यांचा केंद्रीय मंत्रिमंडळातील समावेश निश्चित झाल्याचे वृत्त आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेतील एकाला मंत्रिपद मिळू शकते. त्यासाठी खासदार प्रतापराव जाधव, श्रीकांत शिंदे, धैर्यशील माने, श्रीरंग बारणे यांची नावे चर्चेत आहेत. आरपीआयकडून रिपाइंचे नेते रामदास आठवले यांना एकमेव स्थान असेल, तर भाजपकडून ज्येष्ठ नेते नितीन गडकरी यांच्याबरोबरच पियुष गोयल, नारायण राणे, रक्षा खडसे आदी नेत्यांची नावे चर्चेत आहेत. आता केंद्रात नेमकी कुणाला संधी मिळणार तसेच या व्यतिरिक्त अन्य कुणाचा समावेश होणार का हे शपथविधीवेळी स्पष्ट होईल.

# मी पळणारा नाही लढणारा -उपमुख्यमंत्री फडणवीस

## विरोधकांच्या नरेटिव्हमुळे महायुतीला फटका बसल्याचे विश्लेषण



**मुंबई : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणूक निकालानंतर भाजपचे पदाधिकारी, आमदारांची बैठक शनिवारी (दि. ८) मुंबईत आयोजित करण्यात आली होती. या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी निकालाचे विश्लेषण करीत विरोधकांनी जे नरेटिव्ह तयार केले त्यात ते यशस्वी झाले असे सांगत आगामी काळात ताकदीने जिंकू, असा निर्धार व्यक्त केला.

भाजपच्या प्रदेशाध्यक्षांनी आणि मुंबई अध्यक्षांसह पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांनी या निवडणुकीत अतिशय उत्तम काम केले, मात्र आपण फक्त राजकीय अरिथमेटिकमध्ये कमी पडलो. मी पळणारा नाही, लढणारा आहे. मी उपमुख्यमंत्रिपदावरून दूर झालो असतो तरी एकही दिवस घरी बसणार नव्हतो. चारहीकडून घेरले गेल्यानंतर पुरंदरचा तह करणारे आणि नंतर पूर्ण ताकदीने मैदानात उतरून सगळे किल्ले जिंकणारे छत्रपती शिवाजी महाराज हे आपली प्रेरणा आहेत. माझ्या डोक्यात काही रणनीती होती, आजही आहे. आपण सगळ्यांनी माझ्यावर विश्वास दाखवला. मी काल अमितभाई शाह यांनी भेटलो. त्यांचीही भूमिका तुमच्यापेक्षा फार वेगळी नव्हती, मात्र ते मला म्हणाले की, थोडे दिवस जाऊद्या. आता जे काम सुरू आहे ते सुरू ठेवा आणि त्यानंतर आपण बसून महाराष्ट्राबाबतची ब्ल्यू प्रिंट ठरवू, असा संदेश अमित शाह यांनी दिल्याचे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

विरोधकांच्या नरेटिव्हबद्दल बोलताना उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, भाजप सत्तेत आल्यास संविधान बदलणार हा विषय इतका खालपर्यंत गेला. त्याचा निकालावर परिणाम झाला. दलित, आदिवासी समाजात दिशाभूल करण्याचा प्रयत्न विरोधकांकडून मोठ्या प्रमाणात झाला. जेव्हा जेव्हा मोदी पंतप्रधान झाले तेव्हा त्यांनी नेता निवडीपूर्वी संविधानाच्या पाया पडले. संविधानाला ७५ वर्ष पूर्ण होतायेत. त्यामुळे पुढील एक वर्ष भारताच्या संविधानाचा महोत्सव देशात साजरा केला जाणार आहे असे मोदींनी सांगितले. त्यामुळे आता हा नॅरेटिव्ह जास्त काळ चालणार नाही.

जर विरोधकांच्या यशाचे विश्लेषण केले तर त्यांना कुठे मते मिळाली आणि कुठे नाही यातून हा नरेटिव्ह किती खोटा आहे लक्षात येईल. विशेषत: मराठवाड्यात मराठा आरक्षणाचा नरेटिव्ह तयार केला, पण आश्चर्य वाटते मराठा समाजाला दोन्ही वेळेला आपण आरक्षण दिले, महामंडळे, अनेक योजना या आपल्या काळातच झाल्या. तरीही मराठा समाजाचा फटका बसला, पण ज्यांनी १९८०पासून मराठा आरक्षणाला विरोध केला त्यांच्याकडे मते गेली. याचा अर्थ नरेटिव्ह तयार करण्यात विरोधक यशस्वी झाले, पण आपला मतदार सगळा गेला असता तर ४३ टक्के मते मिळाली नसती, याकडे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी लक्ष वेधले. **(पान २ वर..)**

### भविष्यात आपण चित्र बदलवू

महाराष्ट्रात महाविकास आघाडीला मिळालेल्या मतांची टक्केवारी ४३.९ इतकी आहे, तर आपल्यालाही ४३.६ टक्के मते मिळाली आहेत. मतांमध्ये जास्त फरक नाही, पण त्यांना ३१ आणि आपल्याला १७ जागा. फक्त राजकीय गणितामुळे आपल्याला अपयश आले. याचे विश्लेषण केले तर आपण केवळ तीन पक्षांशी लढत नव्हतो, तर एका खोट्या, नकारात्मक नरेटिव्हला आपण रोखू शकलो नाही, मात्र भविष्यात हे चित्र आपण बदलवू शकतो, असा विश्वास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या वेळी व्यक्त केला.

## मुंबई-गोवा महामार्गावर महाडजवळ दरड कोसळली

### वाहतूक कोंडी, एक मार्गिका बंद

**महाड : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर महाड तालुक्यातील नडगाव हद्दीत शनिवारी (दि. ८) सायंकाळी मुसळधार पावसात छोटी दरड कोसळली. त्यामुळे महामार्गावरील एक मार्गिका बंद होऊन वाहतूक कोंडी झाली.




नडगाव हद्दीत महामार्गालगत फोडलेल्या डोंगरावरून काही भाग सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास खाली आला. त्याचवेळी महाड औद्योगिक वसाहत पोलिसांचे एक पथक तेथून जात होते. या पथकातील पोलीस कॉन्स्टेबल बारवकर यांना दरड कोसळण्याची संभावना दिसताच महामार्गावरील वाहतूक थांबवली. त्यानंतर काही मिनिटांतच ही दरड कोसळली. पोलीस पथकाने दाखवलेल्या या प्रसंगावधानाने मोठी दुर्घटना होताना टळली आहे.

घटनास्थळी महामार्ग विभागाच्या कर्मचाऱ्यांना पाचारण करण्यात आले. महामार्गाची एक मार्गिका बंद करून पोलिसांनी दुसऱ्या बाजूने वाहतूक सुरू केली. तत्पूर्वी काही काळासाठी या ठिकाणी वाहतूक कोंडी झाली होती.

## निवडक

### प्रसिद्ध रामोजी फिल्म सिटीचे संस्थापक रामोजी राव यांचे निधन



**हैदराबाद :** रामोजी फिल्म सिटीचे संस्थापक रामोजी राव यांचे शनिवारी (दि. ८) पहाटे निधन झाले. त्यांची प्रकृती गेल्या काही दिवसांपासून खालावली होती. हैदराबाद येथील स्टार रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते. अखेर वयाच्या ८८व्या वर्षी ते काळाच्या पडद्याआड गेले. त्यांना पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.

### राहुल गांधींना विरोधी पक्षनेता बनवण्याचा प्रस्ताव मंजूर

**नवी दिल्ली :** लोकसभेतील विरोधी पक्षनेतेपदावर राहुल गांधी यांची नियुक्ती करण्याचा प्रस्ताव शनिवारी (दि. ८) काँग्रेसच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत मंजूर करण्यात आला. आपण याबाबत विचार करू, असे राहुल यांनी म्हटले आहे, तर सोनिया गांधी यांची संसदीय पक्षाच्या प्रमुखपदी निवड करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. तोही मंजूर झाला आहे.



**पनवेल : येथील महापालिकेचे नवनियुक्त आयुक्त मंगेश चितळे यांचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक अनिल भगत, नितीन पाटील उपस्थित होते.**

## स्वाभिमान प्राथमिक शिक्षक संघाचा आमदार निरंजन डावखरे यांना पाठिंबा



**ठाणे : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य स्वाभिमान प्राथमिक शिक्षक संघाने विधान परिषदेच्या पदवीधर मतदारसंघ निवडणुकीसाठी भाजपचे उमेदवार आमदार निरंजन डावखरे यांना पाठिंबा जाहीर केला आहे. गेल्या २०१८च्या निवडणुकीप्रमाणेच स्वाभिमान शिक्षक संघाने या निवडणुकीतही पाठिंबा दिल्याने डावखरे यांनी आभार मानले आहेत.

भाजपचे मुरबाड येथील आमदार व संघटनेचे संस्थापक अध्यक्ष किसन कथोरे यांच्या नेतृत्वाखाली संघाच्या पदाधिकाऱ्यांनी आमदार निरंजन डावखरे यांची भेट घेऊन पाठिंब्याचे पत्र दिले तसेच कोकणातील प्रत्येक शिक्षक मतदारापर्यंत पोहचून भाजपला मतदानाचे आवाहन करणार असल्याची ग्वाही दिली. या वेळी संघटनेचे राज्याध्यक्ष यादव पवार, राज्य संपर्क प्रमुख राणू बनसोडे, ठाणे जिल्हाध्यक्ष सुनील पाटोळे, कोषाध्यक्ष विनायक जाधव, तालुका अध्यक्ष नारायण गोल्हे, भरत पांढरे, वसंत घावट, दीपक धूमाळ, रवींद्र घोडविंदे आदी उपस्थित होते.

कोकणात डिजिटल शाळा, शैक्षणिक गुणवत्तेत वाढ, शिक्षकांचे प्रश्न, पेन्शन योजना मंजुरी आदींबाबत आमदार डावखरे यांच्याकडून केला जाणारा पाठपुरावा स्तुत्य आहे, अशा शब्दांत आमदार किसन कथोरे यांनी कौतुक केले तसेच आमदार डावखरे यांना बहुमताने विजय मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.

## राज्यात विविध ठिकाणी दमदार पाऊस



**पुणे : प्रतिनिधी**

हवामान विभागाकडून वर्तविण्यात आलेल्या अंदाजानुसार राज्यात मान्सूनचे आगमन झाले असून विविध भागांमध्ये पाऊस पडत आहेत. पुणे, रायगड, रत्नागिरी सिंधुदुर्ग, सांगलीसह अन्य काही जिल्ह्यांत शनिवारी (दि. ८) मुसळधार पाऊस झाला असून येत्या काही दिवसांत त्याचा जोर कायम राहणार असल्याची चिन्हे आहेत.

पुणे परिसरात मुसळधार पाऊस पडला. अचानक आलेल्या पावसाने नागरिकांची तारांबळ उडाल्याचे दिसून आले. अनेकांनी लागलीच पावसापासून स्वत:चा बचाव करण्यासाठी आडोसा घेतला.

दोन दिवसांपूर्वी गोवामार्गे कोकणात मान्सून दाखल झाला होता. ६ जूनलाच रायगड जिल्ह्यात पावसाने तुरळक हजेरी लावली, मात्र थोड्या फार प्रमाणात पडलेल्या पावसाने वातावरणातील उष्म्याचे प्रमाण आणखी वाढले होते. शनिवारी बराच वेळ महाड, पोलादपूर तालुक्यात पावसाने विजांच्या कडकडाटासह हजेरी लावल्याने हवेत गारवा निर्माण झाला आहे. या परिसरात जोरदार पाऊस पडल्याने ग्रामीण भागात शेतीच्या कामांची लगबग सुरू झाली आहे.

विदर्भातही पावसाने दस्तक दिली आहे. गोंदिया जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून नागरिक उकाड्यामुळे हैराण झाले होते. मान्सूनचे आगमन केव्हा होणार याची प्रतीक्षा नागरिक करीत होते. मृग नक्षत्राच्या प्रारंभातच पावसाने दमदार हजेरी लावल्याने नागरिकांना उकड्यापासून निश्चितच दिलासा मिळाला. त्यानंतर शनिवारी संध्याकाळी अचानक विजेच्या कडकडासह आलेल्या पावसामुळे वातावरण थंड झाले आहे.

महाराष्ट्रात काही भागात चांगला पाऊस पडत असल्याने बळीराजासह नागरिक सुखावले आहे, मात्र काही भागांतील लोक पावसाची आतुरतेने वाट पहात आहेत. त्यांना पावसाची अद्याप प्रतीक्षा असून लवकरच आनंदसरी बसरतील अशी त्यांना आशा आहे.

## तलावात बुडून दोन मुलींचा मृत्यू

**त्र्यंबकेश्वर : प्रतिनिधी**

नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर येथे कपडे धुण्यासाठी बिल्व तीर्थ तलावावर गेलेल्या दोन मुलींचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना शनिवारी (दि. ८) घडली. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, त्र्यंबकेश्वर येथील १३ वर्षीय दोन मुली बिल्व तीर्थ तलावात कपडे धुण्यासाठी गेल्या होत्या. कपडे धुत असताना एक मुलगी पाण्यात पडली. तिला वाचवण्यासाठी दुसरी मुलगी गेली असता दोघींचाही पाण्यात बुडून मृत्यू झाला. या घटनेमुळे त्र्यंबकेश्वर परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. पाण्याअभावी अनेक ठिकाणी अशा दुर्दैवी घटना घडत असल्याचे दिसून येत आहे.



**पनवेल : शिवाजीनगर येथील राधा कृष्ण मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित श्री सत्यनारायणाच्या महापुजेचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुक्रवारी दर्शन घेतले. शिवाजीनगर ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष कृष्णाशेठ ठाकूर यांनी त्यांचे स्वागत केले. या वेळी माजी पं.स. सदस्य रत्नप्रभा घरत, किशोर ठाकूर, अमृत ठाकूर, वीरेंद्र ठाकूर, टी.के. ठाकूर, अरुण घरत, भरत ठाकूर, अमोघ ठाकूर, प्रतीक ठाकूर, अंकित घरत, रजनी ठाकूर, तन्मयी घरत आदी उपस्थित होते.**

# संगमेश्वर धामणीमध्ये रस्ता खचला

## महामार्ग बंद होण्याची शक्यता



**रत्नागिरी : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावर संगमेश्वरमधील धामणी येथे महामार्ग खचण्याची भीती व्यक्त केली जात आहे. संरक्षक भिंतीचे काम अर्धवट स्थितीत राहिल्याने पावसामुळे रस्ता खचण्यास सुरुवात झाल्याचे दिसते. त्यामुळे धामणी येथील रेल्वे ब्रीजच्या जवळ महामार्गावरील वाहतूक आता धोकादायक बनली आहे. आता प्रशासनाने याची वेळीच दखल घेतली नाही तर मुंबई-गोवा हा महामार्ग बंद होण्याची शक्यता आहे.

मुंबई-गोवा महामार्गावर संगमेश्वरमधील धामणी येथे रेल्वे ब्रीजच्या जवळ संरक्षक भिंतीचं सुरू असलेल्या रस्त्याचं काम सध्या बंद आहे. डिझेल तुटवडा असल्याने काम बंद असल्याची राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांनी माहिती दिली. आता ऐन पावसाळ्यात रस्ता खचल्यास महामार्गावरील वाहतूक बंद होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

गेल्या दोन-तीन दिवसांपासून कोकणात मुसळधार पाऊस पडतोय. अशा स्थितीत पहिल्याच पावसात मुंबई-गोवा महामार्गावरील ही परिस्थिती समोर आली आहे. रत्नागिरी-सिंधुदुर्ग मार्गावरील संगमेश्वरजवळील संरक्षक भिंतीचे काम अनेक दिवसांपासून बंद आहे. त्याचा फटका आता नुकत्याच झालेल्या पावसात बसल्याचे दिसून आले. या ठिकाणचा रस्ता आता खचताना दिसत आहे.

अशीच परिस्थिती कायम राहिली तर या महामार्गावरील वाहतूक बंद होण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे खचणाऱ्या रस्त्याला कुठेही पर्यायी मार्ग नाही. महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांकडून डिझेलचा तुटवडा असल्याचे सांगितले जात आहे, मात्र गेल्या अनेक दिवसांपासून हा महामार्ग बंद आहे.

येत्या चार दिवसांत कोकणात मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. त्यातच हा भराव अधिक खचत असल्याचे स्थानिकांनी सांगितलंय. त्यामुळे ऐन पावसाच्या सुरुवातीला मुंबई-गोवा महामार्ग बंद होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# शपथविधी सोहळ्यामुळे दिल्लीत कडक बंदोबस्त

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

लोकसभा निवडणुकीतील विजयानंतर एनडीए संसदीय पक्षाचे नेते नरेंद्र मोदी रविवारी (दि. ९) सायंकाळी सलग तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतील. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांना सरकार स्थापनेसाठी आमंत्रित केले आहे. या शपथविधी सोहळ्यासाठी देश-विदेशांतील प्रमुख नेते, मान्यवर उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे राजधानी दिल्लीतील सुरक्षाव्यवस्था कडक करण्यात आली आहे.

पीटीआयने दिलेल्या वृत्तानुसार शपथविधी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर दिल्लीत कडेकोट सुरक्षा व्यवस्था करण्यात आली आहे. राष्ट्रपती भवनाच्या सुरक्षेसाठी निमलष्करी दलाच्या पाच कंपन्या, नॅशनल सिक्युरिटी गार्ड कमांडो, ड्रोन आणि 'स्नायपर्स' तैनात करण्यात आले आहेत. याशिवाय परदेशी पाहुणे राजधानीतील लीला, आयटीसी मौर्य, ताज, ओबेरॉय आणि क्लेरिजेस हॉटेल्समध्ये थांबणार आहेत. यामुळे ही हॉटेल्सदेखील सुरक्षेच्या कक्षेत घेण्यात आली आहेत.

शपथविधी सोहळ्याच्या दिवशी राष्ट्रपती भवन आणि विविध महत्त्वाच्या ठिकाणी दिल्ली पोलिसांचे स्वॅट आणि एनएसजी कमांडो तैनात असतील. संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या महितीनुसार या समारंभाच्या पार्श्वभूमीवर दिल्ली पोलीस अधिकाऱ्यांनी सुरक्षा योजना तयार करण्यासाठी पोलीस मुख्यालय आणि नवी दिल्ली जिल्ह्यात अनेक बैठका घेतल्या. शपथविधी समारंभ राष्ट्रपती भवनात होणार असल्याने या परिसरात आणि बाहेर त्रिस्तरीय सुरक्षा व्यवस्था असेल. बाहेरील घेऱ्यात दिल्ली पोलिसांतील जवान तैनात असतील. यानंतर निमलष्करी दल तैनात असेल आणि आतील घेऱ्यात राष्ट्रपती भवनाच्या अंतर्गत सुरक्षेतील जवान तैनात असतील.

संबंधित अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार निमलष्करी दलाच्या पाच कंपन्या आणि दिल्ली सशस्त्र पोलीस (डीएपी) दलासह सुमारे २,५०० पोलीस कर्मचारी घटनास्थळाभोवती तैनात करण्याची योजना आहे. आणखी एका अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, मान्यवर ज्या मार्गांचा वापर करतील त्या मार्गावर 'स्नायपर' आणि सशस्त्र पोलीस दलाचे कर्मचारी तैनात असतील तसेच नवी दिल्ली जिल्ह्यातील महत्त्वाच्या ठिकाणी ड्रोनही तैनात करण्यात येणार आहेत.

# मुंब्रा-दिवादरम्यान लोकल ट्रेनमधून पडून तरुणाचा मृत्यू

**कल्याण : प्रतिनिधी**

धावत्या लोकल ट्रेनमधून पडून प्रवाशांचा मृत्यू होण्याचे सत्र सुरूच असल्याचे समोर येत आहे. शुक्रवारी (दि.७) सकाळी पुन्हा एका प्रवाशाचा धावत्या लोकलमधून पडून मृत्यू झाला आहे. २०२४ वर्षामधील जानेवारी ते जून महिन्यातील ही चोविसावी घटना घडल्याची माहिती आहे. सतत घडणाऱ्या घटनेमुळे लोकल प्रवासाविषयी प्रत्येकाला चिंता वाटू लागली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मध्य रेल्वेच्या डोंबिवली ते ठाणेदरम्यान पुन्हा एकदा एका तरुणाचा पडून मृत्यू झाला आहे. शुक्रवारी सकाळी ३८ वर्षीय मयत केयूर सावला हा छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसकडे जात होता. त्यासाठी केयूरने डोंबिवली रेल्वे स्थानकावरुन जलद लोकल पकडली, मात्र डब्यात आत जाता नाही आले म्हणून तो दरवाजाला लटकून प्रवास करीत होता. जलद लोकल काही वेळात दिवा स्थानकावर जाणार त्याचवेळी केयूरचा हात निसटला आणि तो धावत्या ट्रेनमधून खाली पडला.

या घटनेची माहिती मिळताच रेल्वे पोलिसांनी घटनास्थळी पोहचले. केयूरला रुग्णालयात दाखल केल्यानंतर डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. संबंधित घटनेची माहिती केयूरच्या कुटुंबियांना देण्यात आली आहे.

# हार्बर मार्गावर आज मेगाब्लॉक

**पनवेल** : उपनगरीय रेल्वे मार्गावरील रुळांची दुरूस्ती तसेच सिग्नल यंत्रणेत काही तांत्रिक कामे करण्यासाठी रविवारी (दि.९) रेल्वेच्या तिन्ही मार्गावर मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे.

ब्लॉक कालावधीत सीएसएमटी, वडाळा येथून वाशी, बेलापूर, पनवेलकरीता सुटणारी डाउन हार्बर मार्गावरील सेवा आणि वांद्रे, गोरेगाव येथून सीएसएमटीसाठी डाउन हार्बर मार्गावरील सेवा रद्द राहणार आहे, तर पनवेल, बेलापूर, वाशी येथून सीएसएमटीकरीता सुटणारी अप हार्बर मार्गावरील सेवा आणि गोरेगाव, वांद्रे येथून सीएसएमटी सुटणारी अप हार्बर मार्गावरील सेवा बंद राहतील.

# राज्यातील ३९ हजार सहकारी संस्थांच्या निवडणुका लवकरच

## १० जूनपासून सुरू होणार प्रक्रिया

**पुणे : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीसाठी सहकार विभागातील अधिकारी, कर्मचारी यांच्या सेवा संबंधित जिल्हाधिकारी यांनी अधिग्रहीत केल्या होत्या, तसेच सहकार विभागातील तालुका, जिल्हा पातळीवरील अधिकारी, कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत. त्यामुळे निवडणुकीला पात्र असलेल्या राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या निवडणुका ३१ मेपर्यंत पुढे ढकलण्यात आल्या होत्या. लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता शिथिल झाल्याने सहकारी संस्थांच्या निवडणुकीवरील स्थगिती उठविण्यात आली असून, १० जूनपासून राज्यातील सुमारे ३९ हजार सहकारी संस्थांच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे.

याबाबतचा आदेश राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाचे सचिव अशोक गाडे यांनी प्रसृत केला. सहकारी संस्थांच्या निवडणुका ज्या टप्प्यावर पुढे ढकलण्यात आल्या होत्या, त्या टप्प्यापासून १० जूनपासून सुरू करण्यात येणार आहेत. राज्यात ३१ डिसेंबर २०२३ अखेर निवडणुकीस पात्र असलेल्या ९३ हजार ३४२ सहकारी संस्थांपैकी ५० हजार २३८ संस्थांची निवडणूक पूर्ण झाली आहे. निवडणूक प्रक्रिया सुरू असलेल्या दहा हजार ७८३ संस्था आहेत. प्रलंबित २० हजार १३०, तर चालू वर्षी निवडणुकीस पात्र ७८२७ अशा एकूण ३८ हजार ७४० संस्थांची निवडणूक प्रक्रिया आता सुरू होणार आहे. 'अ' आणि 'ब' वर्गातील सहकारी संस्थांचा सुरू असलेला निवडणूक कार्यक्रम ज्या टप्प्यावर पुढे ढकलण्यात आला आहे, त्या सहकारी संस्थांचा सुधारित निवडणूक कार्यक्रम तयार करून सहकार निवडणूक प्राधिकरणाकडे मान्यतेसाठी सादर करावा.

'क' वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणूक कार्यक्रमाला तालुका किंवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांच्या स्तरावर मान्यता देण्यात यावी. ज्या सहकारी संस्थांचा मतदारयादी अंतिम करण्याचा कार्यक्रम ज्या टप्प्यावर पुढे ढकलण्यात आला आहे, त्या टप्प्यापासून पुढे सुधारित मतदारयादी कार्यक्रम राबविण्यात यावा, तसेच निवडणुका पुढे ढकलण्यापूर्वी 'ड' वर्गातील सहकारी संस्थांसाठी प्राधिकरणाने प्राधिकृत अधिकारी नियुक्तीला मान्यता दिली आहे, पण त्या सहकारी संस्थांनी निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी विशेष सर्वसाधारण सभा झाली नाही. अशा प्रसंगी विशेष सर्वसाधारण सभेची नोटीस देऊन निवडणूक प्रक्रिया पूर्ण करावी, असेही आदेशात म्हटले आहे.

# जेएसएम महाविद्यालयास नॅकची 'अ' श्रेणी



**अलिबाग : प्रतिनिधी**

येथील जेएसएम महाविद्यालयास नॅकची 'अ' श्रेणी प्राप्त झाली आहे. जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील, प्राचार्य डॉ. सोनाली पाटील, उपाध्यक्ष प्रा. डॉ. साक्षी पाटील, सेक्रेटरी गौरव पाटील यांनी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, माजी विद्यार्थी, पालकांनी या सर्व प्रक्रियेत दिलेल्या योगदानाबद्दल अभिनंदन केले.

२१ व २२ मे रोजी महाविद्यालयास बेंगळुरू येथील नॅक पिअर टीमने भेट दिली. या टीममध्ये अध्यक्ष म्हणून कुलगुरु महर्षी पाणीनी संस्कृत आणि वैदिक विद्यापीठ उज्जैन, मध्यप्रदेश प्रा. डॉ. सी. जी. विजयकुमार; समन्वयक म्हणून प्रा. डॉ. रणबीरसिंग जगलान, कृषी विद्यापीठ, हिसार हरियाणाचे प्रा. चरणसिंग चौधरी तर सदस्य म्हणून प्राचार्य पद्मावती वुमन्स डिग्री ॲंड पीजी कॉलेज, तिरुपती, आंध्रप्रदेशचे प्रा. डॉ. नारायणम्मा तिरूमला यांचा समावेश होता.

समितीने जेएसएम महाविद्यालयातील वर्गखोल्या, प्रयोगशाळा, विविध शैक्षणिक विभाग, ग्रंथालय, मैदान, जिमखाना, वनस्पती उद्यान, प्रशासकीय कार्यालय, रंगमंच, ॲम्फीथिएटर, स्मार्ट क्लासरूम, अकाऊंट म्युझियम, कॅन्टीन व इतर सुविधांची पाहणी केली. तसेच गेल्या पाच वर्षांत महाविद्यालयाने शैक्षणिक व सहशैक्षणिक क्षेत्रात केलेल्या कामगिरीचा आढावा घेऊन विद्यार्थी, माजी विद्यार्थी, पालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्याशी संवाद साधला.

ही नॅक मूल्यांकन प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्राचार्य डॉ. सोनाली पाटील, महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. अनिल पाटील, निवृत्त प्राध्यापक प्रा. सुरेंद्र दातार, आयक्युएसी समन्वयक डॉ. प्रीती फाटे, सदस्य, प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# उरण येथे श्री स्वामी समर्थ मठाचा वर्धापन दिन

**उरण : वार्ताहर**

शहरातील श्री स्वामी समर्थ समाज मंदिर सेवा संघ आनंद नगर यांच्या वतीने श्री स्वामी समर्थ सहावा वर्धापन दिन नुकताच मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.




सकाळी ८ वाजता भूपाळी आरती, त्यानंतर श्री स्वामी समर्थ महाराजांचा अभिषेक, सकाळी ९ ते १२ वा. पर्यंत श्रीसारामृत, सकाळी १०.३० वाजता नैवेद्य आरती, दुपारी १२ ते ३ वाजेपर्यंत महाप्रसाद ठेवण्यात आला होता. त्यात सुमारे १३७० भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. दुपारी ३.३० ते ६ वाजेपर्यंत पालखी सोहळा, पालखी उरण शहरातील श्री स्वामी समर्थ समाज मंदिर सेवा संघ आनंद नगर येथून निघून पुढे कामठा, एन. आय. हायस्कूल, स्वामी विवेकानंद चौक, गणपती चौक, राजपाल नाका, पुढे श्री स्वामी समर्थ समाज मंदिर सेवा संघ आनंद नगर मंदिरात आली. सायंकाळी ६.३० वा. नैवेद्य आरती, सायंकाळी ७ वाजता भजन व कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

या कार्यक्रमात श्री स्वामी समर्थ सेवा संघ कार्यकारी मंडळ व भक्तगण सहभागी झाले होते.

# कारची दुचाकीला धडक; एकजण ठार

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग-पेण मार्गावर अलिबागपासूनच जवळच राऊतवाडी येथे झालेल्या अपघातात एकजण जागीच ठार झाला. विवेक रमेश पाटील (२८) असे त्याचे नाव असून तो कुरूळ गावचा रहिवासी आहे.




शुक्रवारी रात्री विवेक आपल्या दुचाकीवरून पेणकडून अलिबागच्या दिशेने येत होता. त्याचवेळी समोरून येणाऱ्या कारने त्याच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात विवेक गंभीर जखमी होऊन जागीच ठार झाला. या अपघातात दुचाकीच्या पुढील भागाचा अक्षरशः चक्काचूर झाला आहे. या प्रकरणी कारचालक शामराव पाटील याच्याविरोधात अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

पान १ वरून

## मी पळणारा नाही लढणारा -उपमुख्यमंत्री फडणवीस

महाराष्ट्रातील उद्योग पळवले हा तिसरा नरेटिव्ह विरोधकांकडून तयार केला गेला. प्रत्यक्ष आकडेवारी पाहिली तर २०२२-२३, २३-२४ या दोन्ही वर्षात महाराष्ट्र गुंतवणुकीत पहिल्या क्रमांकावर आहे. उद्धव ठाकरे यांच्या काळात गुजरात, कर्नाटक पुढे होते, परंतु आपल्या काळात गुजरात-कर्नाटक यांची मिळूनही जास्त गुंतवणूक महाराष्ट्रात आली, मात्र विरोधक रोज खोटे बोलायचे, उद्योग पळवले बोलायचे. जर उद्योग पळाले असतील तर गुजरातच्या दुप्पट आणि गुजरात-कर्नाटकपेक्षा जास्त गुंतवणूक आपल्याकडे कशी आली असती, असा सवाल फडणवीस यांनी उपस्थित केला.

ठाण्यापासून कोकणापर्यंत उबाठाला एकही जागा मिळाली नाही. उद्धव ठाकरेंना फार सहानुभूती असती तर मुंबई, कोकणात दिसायला हवी होती. रत्नागिरी-सिंधुदुर्ग, ठाणे, रायगड, पालघर यात एकही जागा मिळाली नाही. मुंबईतील जागा कुणाच्या भरवशावर मिळाल्या हे आपल्याला माहीत आहे. मराठी माणसांच्या मतांवर हे निवडून आले नाहीत. मराठी माणसांनी मत दिलं असते, तर दक्षिण मुंबईत वरळीत जिथे आदित्य ठाकरे आमदार आहेत तिथे केवळ सहा हजार मते अधिक मिळाली. शिवडीत ३०-४० हजार मताधिक्य घेऊ शकले नाहीत. मराठी माणसाने मतदान केले असते, तर मराठीबहुल भागात उद्धव ठाकरेंना फार मोठे मताधिक्य मिळाले नाही, परंतु विशिष्ट समाजाच्या मतांवर एखाद्या विधानसभेत प्रचंड मताधिक्य मिळाल्याने त्यांच्या जागा आल्या. कोकणात उद्धव ठाकरेंना लोकांनी हद्दपार केले, असा हल्लाबोल फडणवीस यांनी केला.



# महापारेषणचा वर्धापन दिन उत्साहात साजरा

## राज्यस्तरीय पारितोषिक वितरण समारंभ




**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीचा १९वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी आयोजिलेल्या राज्यस्तरीय पारितोषिक वितरण समारंभात महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांच्या हस्ते विजेत्यांना प्रशस्तीपत्र व स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

वांद्रे येथील बालगंधर्व रंगमंदिर येथे हा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनीचे संचालक (स्वतंत्र) विश्वास पाठक, महापारेषणचे संचालक (संचलन) सतीश चव्हाण, संचालक (प्रकल्प) अविनाश निंबाळकर, संचालक (वित्त) अनुदीप दिघे, संचालक (मानव संसाधन) सुगत गमरे उपस्थित होते.

सुरुवातीला उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महापारेषणच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिलेल्या शुभेच्छा संदेशाचे वाचन करण्यात आले. डॉ. संजीव कुमार म्हणाले, महापारेषण ही देशात सर्वोत्तम पारेषण कंपनी आहे. महापारेषणने ड्रोनचा वापर सुरू केला आहे. हा ड्रोनचा वापर हा विशेषतः दुर्गम भागातील अतिउच्च दाब वाहिन्यांचे वेळेवर सर्वेक्षण व देखरेख करण्यासाठी चांगला निर्णय ठरला आहे. महापारेषणच्या अधिकाऱ्यांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने उपविभाग स्तरापासून सांघिक कार्यालय स्तरापर्यंत पुरस्कार योजना सुरू केली आहे. भविष्यातही अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी ही पुरस्कार योजना सुरू राहिल.

ऊन-पावसाची तमा न बाळगता विशेष कामगिरी केलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही विविध मनोरंजनात्मक कार्यक्रम या वेळी सादर केले. जनसंपर्क विभागाच्या समन्वयातून महापारेषणच्या सर्वंकष कार्यावर प्रकाश टाकणाऱ्या चित्रफितीने वातावरण ऊर्जामय झाले. प्रसिद्ध गायक श्रीकांत नारायण व उत्तरा केळकर यांच्या गीतांनी कार्यक्रमाला बहार आली.

कार्यक्रमासाठी महापारेषणचे मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) मंगेश शिंदे, महाव्यवस्थापक (मानव संसाधन, मनुष्यबळ नियोजन) राजू गायकवाड, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी भरत पाटील, अधीक्षक अभियंता संजीवकुमार बद्देला, राजशिष्टाचार अधिकारी सतिश जाधव, संचालक (मानव संसाधन) यांचे विशेष कार्य अधिकारी तथा व्यवस्थापक (मानव संसाधन) महेश आंबेकर, रेणुका नाटके यांच्यासह विविध अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## निवडक

### श्री शनिदेव जन्मोत्सव सोहळा



**उरण** : शहरातील गणपती चौक येथील हनुमान मंदिरात श्री शनिदेव जन्मोत्सव सोहळा नुकताच साजरा करण्यात आला. त्या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. स. ६ वा. गुरुजी धनंजय भागवत यांच्या हस्ते महापूजा करण्यात आली. त्यानंतर महाआरती, श्री गजाजन प्रासादिक भजन मंडळ यांचे भजन, दुपारी श्री शनिदेव जन्मोत्सव, श्री हनुमान जन्मोत्सव मंडळ व श्री शनिदेव जन्मोत्सव मंडळ यांच्या वतीने महाप्रसाद, सायंकाळी भजन आदी कार्यक्रम झाले. या वेळी मंडळाच्या अध्यक्ष ॲड. रेखा पाटील, राजेंद्र पाटील, रघुनाथबुवा हातनोलकर, विठ्ठल मामताबादे, धनंजय भागवत, महेश अधिकारी आदींसह भाविक उपस्थित होते.

### अज्ञात महिलेचा मृतदेह आढळला

**पनवेल** : दहिवली गाव परिसरात अज्ञात महिलेचा कुजलेल्या अवस्थेत मृतदेह आढळला आहे. टेक ग्लोबल लॉजिस्टीक कंपनीच्या मागील जागेत एका ३० ते ३५ वयोगटातील महिलेचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत आढळल्याची माहिती पोलीस पाटील महेश पाटील यांनी तालुका पोलिसांना कळविली. वपोनि. अनिल पाटील यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्या ठिकाणी धाव घेत मृतदेह ताब्यात घेतला आहे. महिलेने पिवळ्या रंगाचा वनपिस ड्रेस घातला आहे. कानात झुमके, हातात पिवळ्या धातूच्या बांगड्या, पायात जोडवी आहे. कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल तालुका पोलीस ठाणे दूरध्वनी (२७४५२४४४) किंवा पोलीस उपनिरीक्षक इंगळे यांच्याशी संपर्क साधावा.

### गाडीच्या काचा फोडून मुद्देमाल लंपास

**पनवेल** : एका उभ्या गाडीच्या काचा फोडून अज्ञात चोरट्यांनी आतील दोन लाख ४० हजारांचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना तळोजा औद्योगिक वसाहतीमध्ये दिपक फर्टिलायझर कंपनीसमोरील रस्त्यावर घडली आहे. संजय भोईर यांनी त्यांची गाडी उभी ठेवून ते कामानिमित्त बाजूला गेले असताना अज्ञात चोरट्यांनी त्या दरम्यान त्यांच्या गाडीच्या डाव्या बाजूची काच फोडून गाडीतील दोन लाख रुपये रोख रक्कम व ४० हजार रुपये किंमतीचे सोन्याचे ब्रेसलेट चोरून नेले आहे. याबाबतची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात केली आहे.



**पनवेल : भाजप प्रदेश सदस्य तथा कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील यांना वाढविसानिमित्त युवा मोर्चाचे मयूर पाटील यांनी शुभेच्छा दिल्या. सोबत युवा नेते परेश ठोंबरे व अन्य.**

# पनवेल-कर्जत प्रवास आता सुसाट

## सर्वाधिक लांबीच्या वावर्ले बोगद्याचे खोदकाम पूर्ण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुंबई लोकलच्या पायाभूत सुविधेत मैलाचा दगड ठरणारा सर्वाधिक लांबीच्या वावर्ले बोगद्याचे खोदकाम पूर्ण झाले आहे. मुंबई रेल्वे विकास महामंडळाच्या (एमआरव्हीसी) एमयूटीपी प्रकल्पातंर्गत पनवेल-कर्जत नव्या उपनगरीय मार्गावर लोकल चालवण्यासाठी हा बोगदा वापरण्यात येणार आहे. सध्या महामुंबईत सर्वाधिक लांबीचा पारसिक बोगदा आहे. वावर्ले बोगदा पारसिकच्या दुप्पट लांबीचा आहे.





महामुंबईतील प्रवाशांना नव्या रेल्वे मार्गाचा पर्याय उपलब्ध व्हावा यासाठी पनवेल-कर्जत नवीन उपनरीय मार्गाचे काम वेगाने सुरू आहे. प्रकल्पातील २.६ किमीच्या बोगद्याचे खोदकाम पूर्ण झाले आहे. बोगद्याचे खोदकाम जून अखेरपर्यंत पूर्ण करण्याची कालमर्यादा होती, मात्र काटेकोर नियोजनामुळे जूनच्या पहिल्या आठवड्यात खोदकाम पूर्ण करण्यात आले आहे. आता बोगद्यातील अन्य कामे करण्यात येणार आहे, असे मुंबई रेल्वे विकास महामंडळाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक सुभाषचंद्र गुप्ता यांनी सांगितले.

मुंबईपासून पनवेलमार्गे कर्जत जाण्याचा पर्याय या नव्या रेल्वे मार्गामुळे उपलब्ध होणार आहे. कल्याणमार्गे कर्जत जाण्यापेक्षा कमी वेळ या मार्गाने लागणार असल्याने प्रवाशांच्या वेळेत बचत होईल. पनवेल, कर्जत या नव्या शहरांचा विकास यामुळे वेगाने होईल, असा विश्वास रेल्वे अधिकाऱ्यांचा आहे.

एमआरव्हीसीच्या मुंबई नागरी परिवहन प्रकल्प ३ (एमयूटीपी-३) अंतर्गत पनवेल-कर्जत लोकल आकार घेत आहे. या रेल्वे मार्गावर नढाल, किरवली आणि वावर्ले असे तीन बोगदे उभारण्यात येणार आहेत. यापैकी वावर्ले हा बोगदा २६०० मीटर लांबीचा आहे. नढाळची लांबी २१९ मीटर आणि किरवलीची लांबी ३०० मीटर आहे.

ठाणे-दिवादरम्यान असलेला पारसिक बोगदा हा महामुंबईतील सध्याचा सर्वाधिक लांबीचा अर्थात १.३ किमीचा बोगदा आहे. १९१६ मध्ये वाहतुकीसाठी हा खुला करण्यात आला होता. या बोगद्या व्यतिरिक्त दोन उड्डाणपूल उभारण्यात येणार असून कर्जतजवळील उड्डाणपूल १,२२५ मीटर आणि पनवेललगत १,३७५ मीटरचा आहे. मार्च २०२५पर्यंत प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

## उरणमधील मोकाट श्वानांचा बंदोबस्त करण्याची मागणी

**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

उरणमध्ये मोकाट भटकणाऱ्या व नागरिकांवर जीवघेणा हल्ला करणाऱ्या श्वानांमुळे नागरिकांध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. सकाळी शाळेत जाणारे मुले, मॉर्निंग वॉक करणारे नागरिक, रात्री उशिरा कामावरून घरी परतणाऱ्या कामगारांवर हे मोकाट श्वान हल्ले करीत असल्याने नागरिकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे.



उरण नगर परिषद हद्दीतील वीर सावरकर मैदान (लाल मैदान) येथे काही दिवसांपूर्वी मोकाट श्वानांनी एका व्यक्तीला हातावर चावून जखमी केले होते. जखमी व्यक्तीला त्वरित हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करण्यात आले होते. नगर परिषदेने या महत्त्वाच्या समस्येकडे दुर्लक्ष केल्याने मोकाट श्वानांच्या संख्येत वाढ झाल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. नगर परिषदेने या भटक्या श्वानांच्या बंदोबस्त करावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. या संदर्भात तालुका आरोग्य अधिकारी डॉ. राजेंद्र इटकरे यांना संपर्क केला असता तो होऊ शकला नाही.

**उरण शहरातील भटक्या कुत्र्यांवर नगर परिषदेने योग्य ती कारवाई करावी जेणेकरून मोकाट कुत्रे नागरिकांना त्रास देणार नाहीत. कुत्र्यांचे निर्बिजीकरण करण्यात यावे जेणेकरून कुत्र्यांची संख्या वाढणार नाही.**

**- डॉ. फरहान नेरेकर, नागरिक**

## महिलेची साडेपाच कोटी रुपयांची ऑनलाईन फसवणूक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरातील एका सेवानिवृत्त ६४ वर्षीय महिलेची ऑनलाईन पद्धतीने तब्बल साडेपाच कोटींची फसवणूक करण्यात आली आहे. मागील महिन्यात ही घटना घडली. याबाबत शुक्रवारी (दि.७) पीडित महिलेने पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविली आहे.

संबंधित महिला या खासगी कंपनीत मानव संसाधन विभागात काम करीत असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरिक्षक नितीन ठाकरे यांनी दिली. ८ मे रोजी पळस्पे फाटा येथील साईवर्ल्ड सिटी या संकुलामध्ये राहणाऱ्या ६४ वर्षीय महिलेला फोनवरून सकाळी संपर्क साधून आरोपीने त्याची ओळख सीबीआय अधिकारी असल्याचे सांगितले तसेच दुसऱ्या व्यक्तीने तो मुंबई येथील टेलिकॉम रेग्युलेटरी प्राधिकरणाचा नोटरी अधिकारी असल्याची ओळख सांगितली.

या दोन्ही भामट्यांनी ६४ वर्षीय महिलेला, तुमच्या मोबाईलवरून इतरांना फोन करून मानसिक त्रास दिला जात असून त्याच्या तक्रारी सीबीआयकडे नोंदविल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे या महिलेला १० वर्षांचा तुरुंगवास भोगण्याची भीती दाखविण्यात आली.

सीबीआयने कारवाई करू नये यासाठी पीडित महिलेकडून पाच कोटी ६१ लाख एक हजार रुपये विविध बँक खात्यात वळते करण्यास भाग पाडले. याबाबत या पीडित महिलेने सर्वत्र खात्री केल्यानंतर त्यांना हा सर्व बनाव असल्याचे उघड झाले. शुक्रवारी याबाबत पीडित महिलेने पोलिसांत तक्रार नोंदविली आहे.

नवी मुंबई पोलीस दलाचे आर्थिक गुन्हे अन्वेषण विभाग याप्रकरणी ऑनलाईन भामट्यांचा शोध घेत आहेत. या फसवणुकीमध्ये चोरट्यांनी मुंबई पोलीस १११ या नावाच्या युआरएलचा वापर केला तसेच स्काईप पत्यावर सीआयडी असा उल्लेख असल्याने पीडित महिलेला काही वेळेसाठी हे सर्व खरे असल्याचे वाटल्याने ही फसवणूक झाली.

## कळंबोलीत वीज ग्राहकांचा अधिकाऱ्यांना घेराव

**कळंबोली : प्रतिनिधी**

कळंबोलीत सतत वीज गायब होत असल्याने वीजग्राहक प्रचंड संतप्त झाले आहेत. यामुळे घरातील विजेची उपकरणे निकामी होत आहेत. अखेर वारंवार होणाऱ्या सततच्या अनियमित वीजपुरवठ्याबाबत त्रस्त झालेल्या गुरुव्हिला सोसायटीतील नागरिकांनी कळंबोलीतील वीज अधिकाऱ्यांना घेराव घालून सुरळीत वीजपुरवठ्याच्या मागणीचे लेखी निवेदन अध्यक्ष जगदीश पाटील यांनी दिले. या वेळी पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक बबन मुकादम उपस्थित होते.

गेल्या एक ते दीड महिन्यापासून कळंबोली वसाहतीमधील सेक्टर ४मध्ये अनियमित विजेचा पुरवठा होत आहे. पाच ते सहा तास वीज गायब होणे असे प्रकार वारंवार घडत आहेत. याचा सर्व परिणाम हा नागरी सेवा आणि सुविधांवर होत आहे. गृहनिर्माण सोसायटीमधील वीज गायब झाल्याने तेथे पाणीपुरवठा कसा करायचा? या विवंचनेने नागरिक त्रस्त होत आहेत.



**वीजपुरवठा सुरळीत करण्याची मागणी**

अनेक वेळा एक फेज बंद होत असल्यामुळे अनेकांच्या घरातील विजेची उपकरणे नादुरूस्त होण्याचे प्रकारही वारंवार घडत आहेत. वारंवार तक्रारी करूनही याची दखल कळंबोलीतील वीजपुरवठा अधिकारी घेत नसल्याने अखेर त्रस्त झालेल्या वीजग्राहकांनी कळंबोलीतील माजी नगरसेवक बबन मुकादम यांच्या नेतृत्वाखाली कळंबोलीतील वीज कार्यालयात धडक दिली.

या वेळी राजू उतेकर, माजी सैनिक पवन पवार, ज्येष्ठ नागरिक सिताराम दडस, केसरीनाथ मोकल, मंगेश मर्चंडे, सचिन लोंढे आदींसह अनेक नागरिक उपस्थित होते. वसाहतीमधील नागरिकांना समर्पक उत्तर देणारे अधिकारी उपलब्ध नसल्याने याबाबत योग्य कार्यवाही करण्याचे आयवासन तेथील कर्मचारी वर्गाने दिले आहे.



**पनवेल : महापालिकेचे माजी नगरसेवक विकास घरत यांनी वाढदिवसनिमित्त शनिवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विकास घरत यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, माजी नगरसेवक विजय चिपळेकर, प्रदीप भगत, हर्षवर्धन पाटील, दामोदर चव्हाण यांच्यासह पदाधीकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**

## मासेमारी बंदीमुळे बोटी किनाऱ्यावर शाकारल्या

**उरण : वार्ताहर**

१ जून ते ३१ जुलैपर्यंत शासनाच्या मासेमारी बंदीच्या आदेशानंतर मासळीची आवक घटली आहे. आता कोळी बांधवांनी आपल्या बोटी किनारी आणून शाकारणी केली आहे.



करंजा, मोरा, रेवस, मुळेखंड, खोपटा व वशेणी गव्हाण आदी ठिकाणी बंदरावर बोटी नांगरून ठेवण्यात आल्या आहेत. रायगड जिल्ह्यामध्ये पाच हजारांहून अधिक मासेमारी नौका आहेत. त्यामध्ये काही नौका यांत्रिकी तर काही बिगरयांत्रिकी आहेत. ३१ मे हा मासेमारी हंगामाचा शेवटचा दिवस होता. आता पुढील दोन महिन्यांसाठी या बोटीत किनाऱ्यावर विसावल्या आहेत. त्यानंतर ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यापासून पुन्हा एकदा मासेमारीच्या नव्या हंगामाला सुरुवात होणार आहे.

बदलते हवामान, समुद्रात निर्माण होणारे प्रदूषण, जेलीफिश असा अनेक समस्यांमुळे मासेमारीवर परिणाम होतो. त्यामुळे मासळीच्या उत्पादनात घट होते. तरीदेखील जिल्ह्यातील मच्छीमार सर्व संकटांवर मात करीत मासेमारीचा व्यवसाय करत आहेत. जून महिन्यात उधाणाबरोबरच वारा, वादळ येते. मासेमारीसाठी गेलेल्या बोटी अडकण्याचा धोका अधिक असतो. खोल समुद्रात मासेमारी करणाऱ्यांवर कारवाई केली जाणार आहे. मासेमारी बंदीमुळे मच्छिमारांनी नौका किनारी लावण्यास सुरुवात केली आहे. अनेक जण या हंगामात किनारी भागात मिळणाऱ्या मासळीवर आपली उपजीविका करीत आहेत.

## आपत्ती व्यवस्थापनासंदर्भात पनवेल महापालिकेची बैठक

**पनवेल : प्रतिनिधी**

पावसाळ्यात आपत्ती ओढावू नये यासाठी मान्सूनपूर्व कामे व आपत्ती व्यवस्थापन कामाचा विभागवार सविस्तर आढावा शनिवारी (दि.८) आयुक्त मंगेश चितळे यांनी महापालिका मुख्यालयात घेतला. या वेळी त्यांनी धोकादायक इमारती, अनधिकृत होर्डिंग निष्कासित करण्याच्या व रस्त्यावर पावसाळ्यात पडणारे खड्डे भरण्यासाठी इंजिनिअर्सची एक टिम तयार करण्याच्या सूचना आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.



बैठकीला उपायुक्त कैलास गावडे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, उपायुक्त मारूती गायकवाड, शहर अभियंता संजय जगताप, कार्यकारी अभियंता संजय कटेकर, सहाय्यक आयुक्त स्वरूप खारगे, उपअभियंता सुधीर सांळुखे, पाचही प्रभागांचे विभागप्रमुख, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख दशरथ भंडारी, स्वच्छता निरीक्षक शैलेश गायकवाड, अरूण कांबळे, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पावसाळ्यादरम्यान धोकादायक इमारती पडून कोणतीही हानी होऊ नये यासाठी अनधिकृत इमारतींचा आढावा आयुक्तांनी घेतला. महापालिका हद्दीमध्ये ७९ धोकादायक इमारती असून यापैकी ४० इमारती रिक्त करण्यात आल्या. यातील दोन इमारतींवर महापालिकेच्या वतीने निष्कासन कारवाई सुरू असून उर्वरित इमारतींमधील पाणी व वीज पुरवठा बंद करून लवकरात लवकर रिकाम्या करून त्यांच्यावरती कारवाई करण्याच्या सूचना आयुक्तांनी संबधित विभागास दिल्या.

महापालिका कार्यक्षेत्रातील ३३ अनधिकृत होर्डिंग्ज आढळून आले असून यापैकी सुमारे २१ अनधिकृत होर्डिंग्जवर पालिकेने कारवाई करून हे होर्डिंग्ज निष्कासित केले आहे. उर्वरित होर्डिंग्जचा क्विक सर्व्हे करून त्यामधील अत्यंत धोकादायक होर्डिंग्ज निष्कासित करण्याच्या सूचना दिल्या.

चार प्रभागांमध्ये पाणी भरणारे नऊ मोठे नाले आहेत. या नाल्यांची तसेच इतर नाल्यांची साफसफाई युद्धपातळीवर सुरू आहे. यामधील चार महत्त्वाच्या नाल्यांना तातडीने फायबर गेट बसविण्याबाबत आयुक्तांनी सूचना दिल्या. याचबरोबर पाऊस सुरू होण्यापूर्वी अजूनही ज्याठिकाणचे खड्डे भरलेले नाही ते भरून घेणे, पावसाळ्यातील खड्डे भरण्यासाठी इंजिनिअर्सची एक टिम बांधकाम विभागाने तयार करावी अशा सूचना आयुक्तांनी बांधकाम विभागास दिल्या, तसेच पाणी साठणाऱ्या सखल भागात तातडीने सर्व ठिकाणी पंप बसविण्याबाबत आयुक्तांनी सूचना दिल्या.

# एक दिग्दर्शक, एक वर्ष, चार चित्रपट, सर्वच सुपर हिट

## मनमोहन देसाईंची कम्माल...




















दिग्दर्शक मनमोहन देसाईंच्या चित्रपटात इतकं आवडण्यासारखे काय असते? माहीत नाही. याचा अर्थ त्याबाबत अज्ञान आहे असे नव्हे. त्याच मनमोहन देसाईच्या चित्रपटात न आवडण्यासारखे काय असते?

काहीच सांगता येत नाही. त्यांचे चित्रपट एक भन्नाट मनोरंजक अनुभव. मला वाटतं, हेच मनमोहन देसाई यांच्या चित्रपट दिग्दर्शनाचे मोठेच यश आहे. जे कशात आहे हे सांगणे अवघड जावे.

काळ पुढे सरकत राहिलाय. एकपडदा अर्थात सिंगल स्क्रीन थिएटर्सचा काळ मागे पडून मल्टीप्लेक्स, ओटीटी प्लॅटफॉर्मवर चित्रपट आला, पडद्यावरून चित्रपट हातातील मोबाईलवर आला तरी हिंदी चित्रपटसृष्टीतील सर्वोत्कृष्ट यशस्वी दहा दिग्दर्शकांत मनमोहन देसाई यांचे नाव घेतले जातेच.

तात्कालिक समिक्षकांना (तेही साठ/सत्तर/ऐंशीच्या दशकातील) मनजींचे चित्रपट आवडत होते का? तर नाही. त्यांच्या जवळपास सर्वच चित्रपटांची सर्वसाधारण स्वरुपातच समिक्षा होई, कारण त्यांच्या चित्रपटात प्रतिकात्मक दृश्य (सिम्बॉलिक टच) नसे, ते त्यांना फारसे गरजेचे वाटत नसे. त्यांच्या चित्रपटातून सामाजिक प्रबोधन असणे शक्यच नव्हते. यासाठी 'अमर अकबर ॲन्थनी' हे लहानपणीच हरवलेले तीन भाऊ मोठेपणी तीन खाटांवर पडून एकाच वेळेस आपल्या वृध्द आईला रक्तदान करतात हा एकमेव प्रसंग आठवला तरी चालेल. त्यात खरं तर त्यात आठवण्यासारखे काहीच नाही, पण विसरून जावे असेही काही नाही. मनजींनी मात्र हाच प्रसंग हाऊसफुल्ल गर्दीला पचनी पडेल अशा पद्धतीने पडद्यावर साकारला, रसिकांच्या टाळ्या वसूल केल्या आणि चित्रपटाची श्रेयनामावली सुरू झाली.

अशा मनजींनी १९७७ साली एक फिल्मी विक्रम केला. तो कधीच मोडला जाणार नाही. त्या एकाच वर्षी त्यांचे एकूण चार चित्रपट प्रदर्शित तर झालेच, पण ज्युबिली हिटही झाले. ते प्रगती पुस्तक असे आहे, एम.एम. मल्होत्रा व बलदेव पुष्कर्णा निर्मित चाचा भतिजा (या चित्रपटाची पटकथा सलिम जावेद यांची असूनही मनजींनी आपले हुकमी पटकथालेखक प्रयाग राज यांनाही जोडीला ठेवले. या चित्रपटात धर्मेंद्र, हेमा मालिनी, रणधीर कपूर व योगिता बाली यांच्या प्रमुख भूमिका. हा चित्रपट मुंबईत ११ जानेवारी रोजी प्रदर्शित झाला. मेन थिएटर सेन्ट्रल), सुभाष देसाई निर्मित धरमवीर (या चित्रपटाची पटकथा के.बी. पाठक व प्रयाग राज यांची. चित्रपटात धर्मेंद्र, जितेंद्र, झीनत अमान, नीतू सिंग, इंद्राणी मुखर्जी इतरांच्या प्रमुख भूमिका. मुंबईत रिलीज १ एप्रिल. मेन थिएटर गंगा), स्वतःच मनमोहन देसाई निर्मित, त्यांच्याच एमकेडी फिल्मचा अमर अकबर ॲन्थनी (या चित्रपटाची कथा कल्पना जीवनप्रभा देसाई व पुष्पा शर्मा यांची. पटकथालेखन के.के. शुक्ला आणि संवाद कादर खानचे. या मल्टी स्टार कास्ट चित्रपटात विनोद खन्ना, अमिताभ बच्चन, ऋषि कपूर, शबाना आझमी, नीतू सिंग, परवीन बाबी, निरुपा रॉय, प्राण, जीवन. मुंबईत रिलीज २७ मे. मेन थिएटर ऑपेरा हाऊस), ए.जी. नडियादवाला निर्मित 'परवरीश'(पटकथालेखन के. के. शुक्ला व प्रयाग राज. संवाद लेखन कादर खान. या चित्रपटात शम्मी कपूर, विनोद खन्ना, अमिताभ बच्चन, शबाना आझमी, नीतू सिंग. मुंबईत रिलीज २७ ऑक्टोबर दिवाळी. मेन थिएटर सेन्ट्रल. तोपर्यंत त्याच सेन्ट्रल थिएटरमध्ये 'चाचा भतिजा'ने पंचवीस आठवड्यांचा खणखणीत मुक्काम केला होता.)

हे चित्रपट आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल मीडियात, मल्टीप्लेक्स, ओटीटीच्या प्रेक्षकांना फारसे आवडतील असे वाटत नाही. काहींना त्यात अतिशोयोक्ती दिसेल. कुठे लहानपणीच हरवलेले भाऊ मोठेपणी सापडणे (लॉस्ट ॲण्ड फाऊंड फॉर्मुला), कधी मैत्रीची साद वा हाक, कधी दुश्मनी, कधी अगदीच भाबडे प्रसंग, (हास्यास्पद वाटले तरी मनजींचा पिक्चर म्हणूनच एन्जॉय केले जात), हमखास टाळ्या वसूल होतील असे डायलॉग या सगळ्यांची त्यांच्या मसाला मिक्स पिक्चरमध्ये मनसोक्त रेलचेल. सत्तरच्या दशकात मात्र हे मनोरंजनाचा सर्व प्रकारचा मसाला असणारे पिक्चर्स'. त्या काळात पारंपरिक चित्रपटातून अपेक्षा त्या काय असत? एन्टरटेन्मेन्ट एन्टरटेन्मेन्ट एन्टरटेन्मेन्ट. आनंद झाला, पिक्चरला जा, दुःख झालं पिक्चरला जा. पडद्यावरच्या जगात स्वतःला विसरून जाणे. पडद्यावरील 'नायका'च्या जागी स्वतःला बघ. त्याच्या रूपेरी पराक्रमाशी एकरूप हो. काही फॅन्स तर आवडत्या हिरोसारखं डिट्टो दिसण्याचा/पाहण्याचा/बोलण्याचा/ऐकण्याचा अधिकाधिक प्रयत्न कर. बरं हे एवढ्यावरच थांबत नसे. कट्टा/नाका/गॅलरी/गच्ची/कॉलेज कॅन्टीन, इतकेच नव्हे फिल्मी नियतकालिकातील 'वाचकांच्या पत्रा'मधूनही आपल्याच आवडत्या कलाकाराची बाजू घेऊन बोलायचे, लिहायचे, सांगायचे असाच जणू हट्ट असे आणि गीत संगीत नृत्याची मेजवानी हवीहवीशी. पिक्चर पूर्ण झाला रे झाला त्याच्या गाण्याची ध्वनिमुद्रिका म्युझिक हाऊस अथवा रिदम हाऊसमध्ये विक्रीला आली रे आली की त्याच्या 'कव्हर पेज'पासूनच आकर्षण असे. ही गाणी ध्वनिफीत, रेडिओ विविध भारती, रेडिओ सिलोन, लाऊडस्पीकर, इराणी हॉटेलमधील ज्यूक बॉक्स यातून ही गाणी जनसामान्यांपर्यंत पोहचत आणि पिक्चरची हवा निर्माण होई. मनजींच्या चित्रपटात सर्व प्रकारची गाणी हे हुकमी समीकरण. प्रेमगीत (अनेकदा एकापेक्षा अधिक) मैत्रीगीत, मस्तीगीत, क्लायमॅक्स गीत अशी बहुरंगी गाणी. मनजींच्या १९७७च्या चारही चित्रपटांना लक्ष्मीकांत प्यारेलाल यांचे संगीत आणि गाणीही सोप्या शब्दांतील, सोप्या चालीतील, म्हणूनच सहज गुणगुणता येतील अशी. (हे काव्य नव्हे, ही फिल्मी गीते असं टवाळीने म्हटलं तरी मनोरंजक चित्रपटाची ती ओळख आणि गरज असते.) तेरा शीशे का सामान, भूतराजा बाहर आजा (चाचा भतिजा), सात अजुबे इस दुनिया, हम बंजारों की बात मत पुछो जी, बंद हो मुठ्ठी लाख की (धरमवीर), देख के तुमको हम बोला है, माय नेम इज ॲन्थनी गोल्सालवीस, एक जगह जब जमा हो तीनो (अमर अकबर ॲन्थनी), हम प्रेमी प्रेम करना जाने, जाने हो जाने जा (परवरीश) ही या चित्रपटातील हिट गाणी.



**झूम प्रहर**

**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

मी गिरगावातील खोताडीवाडीत लहानाचा मोठा झालो आणि शालेय वयातच समजले की, माझ्या घरापासून अवघ्या पाच सात मिनिटाच्या अंतरावरील खेतवाडीतील प्रताप निवासमध्ये 'सच्चा झूठा'चे दिग्दर्शक मनमोहन देसाई राहतात. (त्या वयातील आवडतं पिक्चर आणि त्यात राजेश खन्नाचा डबल रोल. एकाच तिकीटात दोन राजेश खन्ना, पिक्चर आवडायला आणखी काय हवे?) मनमोहन देसाई घराबाहेर पडून गाडीत बसण्यापूर्वी युनियन हायस्कूलजवळील देवळाबाहेर उभे राहून बूट वा चप्पल काढून नमस्कार करत. मनमोहन देसाईना मी पहिल्यांदा पाहिले ते हे असे. काही वर्षांतच डॉ. भडकमकर मार्गावरील अप्सरा थिएटरसमोरील गिल्डन मैदानावर टेनिस चेंडूवर मनजींना मी मनसोक्त क्रिकेट खेळताना पाहू लागलो. मनजींच्या याच वागण्यात त्यांचे दिग्दर्शनही यश होते. मी मीडियात आल्यावर मनजींच्या भेटीचे, मुलाखतीचे, त्यांच्या चित्रपटांच्या सेटवर शूटिंग रिपोर्टींगसाठी जाण्याचे (त्यांनी निर्मिलेल्या आणि केतन देसाई दिग्दर्शित 'अल्लारखा'च्या चेंबूरच्या आर.के. स्टुडिओत मी पाऊल टाकताच मला दिसले मनजी दूरचित्रवाणीवर भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया क्रिकेट सामना एन्जॉय करीत होते. जनसामान्यांची आवड हीच त्यांची आवड आणि म्हणूनच त्यांनी जनसामान्यांना आपलेसे वाटतील असे चित्रपट त्यांनी घडवले.) त्यांच्या चित्रपटाच्या मुहूर्ताला हजर राहण्याचे योग (नटराज स्टुडिओत 'गंगा जमुना सरस्वती'चा मुहूर्त आठवतोय. अमिताभ व मिथुन चक्रवर्ती यांच्यासह ऋषि कपूरही हजर होता, पण मुहूर्ताचे आमचे कव्हरेज प्रसिद्ध होण्यापूर्वीच ऋषि कपूरने चित्रपट सोडला), मनजींच्या मुलाखतीचा योग म्हणजे दिलखुलास, उत्फूर्त गप्पा. बेधडक उत्तरे. त्यातील अनेक मुद्यांपैकी एक म्हणजे, सिंगल स्क्रीन थिएटर्सला येत असलेल्या पब्लिकला समजेल, आवडेल असाच चित्रपट निर्मिणे महत्वाची. उगाच तांत्रिक करामती, कॅमेर्याचे कौशल्य दाखवण्याची गरज नाही. (पस्तीस वर्षांपूर्वीच्या चित्रपट संस्कृतीनुसार हे त्यांचे बोलणे होते).

मनमोहन देसाई कदाचित दर्जेदार (तो कसा ठरवणार?) दिग्दर्शक म्हणून ओळखला जात नसतील, पण जनसामान्यांचे दिग्दर्शक हे त्याचे वैशिष्ट्य महत्त्वाचे. आपल्या देशातील चित्रपट संस्कृतीत प्रेक्षकांची पहिली गरज पैसा वसूल मनोरंजन हवे. मनमोहन देसाई यांनी तेच पेरले म्हणूनच तर १९७७ या एकाच वर्षात त्यांच्या चारही चित्रपट हाऊसफुल्ल यशस्वी ठरले. एकाच वर्षात चार चित्रपट म्हणजे, वेळ व शक्ती किती खर्च झाली याची मोजदाद न केलेली बरी. आपल्या कामात पूर्णपणे झोकून दिलेलाच असे यश प्राप्त करू शकतो. मनमोहन देसाई म्हणूनच ग्रेट!

# क्रांतिकारक वीर बिरसा मुंडा



बिरसा मुंडा यांचा आज स्मृतिदिन. बिरसा मुंडा हे एक भारतीय आदिवासी क्रांतिकारक होते. ते आदिवासी समाजाचे वीर नायक होते. १९व्या शतकातील शेवटच्या वर्षात मुंडा जमातीच्या आदिवासींकडून इंग्रज सरकारविरुद्ध जनआंदोलने केली, त्याचे नेतृत्व बिरसा मुंडा यांनी केले होते. त्यांचा जन्म १५ नोव्हेंबर १८७५ रोजी झारखंडमधील उलीहातू येथे झाला. बालपण इतर मुंडा आदिवासी मुलांप्रमाणेच जंगलात व ग्रामीण भागात व्यतीत झाले. त्यांचे वडील जनावरे चारण्याचे काम करायचे. तेही वडिलांसोबत रानात जाऊन धनुर्विद्या व नेमबाजीचा सराव करायचे. बालपणीच त्यांचा नेम फार चांगला होता. पुढे मुंडा प्रसिद्ध वैष्णव भक्त आनंदानंद पांडे यांच्या संपर्कात आले.

वाचन व लेखन येत असल्याने बिरसा मुंडे यांनी महाभारत, रामायण व गीता असे अनेक हिंदू धार्मिक ग्रंथांचे वाचन केले. त्यांच्यासोबत राहून इंग्रजांच्या काळ्या धोरणाचा त्यांना फार तिरस्कार यायचा. बिरसा मुंडा यांनी १९००मध्ये इंग्रजांविरुद्ध विद्रोह करण्याची घोषणा केली व म्हटले, आम्ही ब्रिटिश शासनाच्या तत्वांविरुद्ध विद्रोहाची घोषणा करतो. आम्ही कधीच ब्रिटिशांच्या कायद्यांना मानणार नाही. आम्ही इंग्रजांचे अधिपत्य स्वीकारत नाही.

जो इंग्रज आमच्याविरुद्ध उभा राहील त्यास आम्ही यमसदनी पाठवू. यामुळे संतप्त ब्रिटिश सरकारने आपली सेना बिरसा मुंडा यास पकडण्यासाठी पाठविली. बिरसा मुंडा यांनी विविध जमातीच्या गटांना एकत्र आणले. त्यांना इंग्रजांविरुद्ध लढण्यास प्रेरित केले. इंग्रज सरकारने बिरसा मुंडा यास अटक केली. त्यांच्यासोबत ४६० आदिवासी युवकांनाही अटक करण्यात आली. अशा या थोर क्रांतिकारकाचे ९ जून १९०० रोजी निधन झाले.

बिरसा यांच्या आंदोलनाची ब्रिटिशांना गंभीरपणे दखल घ्यावी लागली. ब्रिटिशांनी 'छोटा नागपूर टेनन्सी क्टख्र मंजूर करून आदिवासींचे जमिनीवरील हक्क मान्य केले (१९०२). आदिवासी-हक्क, स्त्री-स्वातंत्र्य, मानवी प्रतिष्ठा यांच्यासाठी लढा देणारा पहिला आदिवासी नेता म्हणून बिरसा यांची ओळख आहे. रांची येथील डिस्टिलरी पुलाजवळ बिरसांची समाधी असून तेथे त्यांचा पुतळा उभारला आहे तसेच रांची येथील केंद्रीय कारागृहास आणि आंतरराष्ट्रीय विमानतळास बिरसा मुंडा यांचे नाव देण्यात आले आहे.

बिरसा यांनी शिक्षणाचा उपयोग आदिवासींचं जीवनमान उंचावण्यासाठी केला. आदिवासींचे जीवन अभ्यासले. जंगलात अनेक दिवस काढले. आदिवासींमध्ये जनजागृती केली. भारतीय संस्कृती, आयुर्वेद समजून घेतले. औषधी विज्ञानात पारंगत झाले. रुग्णांची सेवा करू लागले. घर स्वच्छ ठेवा. खोटं बोलू नका. एकजूट राहा. निर्णय पंचायतकडून करा, असा संदेश त्यांनी आदिवासींना दिला.

देशभरात विशेषत: बिहार, ओडिशा, झारखंड, छत्तीसगड, पश्चिम बंगाल या भागात बिरसा मुंडा यांना क्रांतीसूर्य मानले जाते. १५ नोव्हेंबरला बिरसा मुंडा यांची जयंती आदिवासी बांधव साजरी करतात. (साभार : इंटरनेट)

# भारतातील पहिल्या महिला आयपीएस किरण बेदी



किरण बेदी या भारतातील पहिल्या आयपीएस (अखिल भारतीय इंडियन पोलीस सर्व्हिससाठीच्या परीक्षेतून आलेल्या) अधिकारी आहेत. मसूरी येथील राष्ट्रीय अकादमीमध्ये पोलीस ट्रेनिंगमध्ये ८० पुरुष तुकडीतील त्या एकमेव महिला होत्या. त्यांचा आज जन्मदिन आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया त्यांच्याविषयी या लेखातून...

किरण बेदी यांचा जन्म ९ जून १९४९ साली झाला. त्यांचे शिक्षण अमृतसरमधील सेक्रेड हार्ट कॉन्व्हेंट स्कूलमधून झाले. शिक्षणाबरोबरच बेदी या खेळातही चपळ होत्या. शाळेत असताना त्या एनसीसीत होत्या. पोलीस सेवेतील कारकीर्द सुरू करण्यापूर्वी अमृतसर येथील खालसा महाविद्यालयात राज्यशास्त्र विषयाच्या प्राध्यापक होत्या.

किरण बेदी यांची पोलीस अधिकारी म्हणून पहिली नेमणूक दिल्लीच्या चाणक्यपुरीत झाली. पुढे त्या उत्तर आणि पश्चिम दिल्लीच्या पोलीस आयुक्त झाल्या. १९९३ मध्ये दिल्लीतील तिहार कारागृहाच्या त्या मुख्य अधीक्षक (इन्स्पेक्टर जनरल ऑफ प्रिझन्स) झाल्या. तेथे असताना त्यांनी कारागृहामध्ये अनेक सुधारणा केल्या. त्याची जागतिक स्तरावर प्रशंसा झाली आणि या सुधारणेसाठी १९९४मध्ये त्यांना रेमन मॅगसेसे पुरस्कार मिळाला.त्यांनी महिलांवरील गुन्हे कमी करून दाखवले. त्यानंतर एक ट्रॅफिक पोलीस अधिकारी म्हणून त्यांनी १९८२ आशियाई गेम्ससाठी दिल्लीत आणि १९८३मध्ये गोव्यात भरलेल्या सीएचओजीएम बैठकीसाठी रहदारी व्यवस्था पाहिली.

किरण बेदी यांनी उत्तर दिल्लीच्या डीसीपी असताना ड्रग्जचा दुरूपयोग करण्याऱ्यांविरुद्धच्या मोहिमेची सुरुवात केली. ही मोहीम पुढे नवज्योती दिल्ली पोलीस फाऊंडेशन (२००७मध्ये हिचे नाव नवज्योती इंडिया फाऊंडेशन म्हणून बदलले)मध्ये विकसित झाली. २००३मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाचे महासचिव म्हणून पोलीस सल्लागार म्हणून बेदींनी काम केले. शांतता ऑपरेशनचा या सामाजिक कार्यक्रम आणि लेखन यांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी त्यांनी २००७मध्ये पोलीस खात्याचा राजीनामा दिला. बेदी यांनी अनेक पुस्तके लिहिली आहेत. त्या इंडिया व्हिजन फाऊंडेशन नावाची संस्थेच्या संचालक आहेत. २००८-२००९ दरम्यान त्यांनी दूरचित्रवाणीवर 'आप की कचेरी' हा एक कोर्ट शो आयोजित केला.

२०११च्या भारतीय भ्रष्टाचारविरोधी चळवळीच्या प्रमुख नेत्यांपैकी किरण बेदी एक होत्या आणि जानेवारी २०१५मध्ये त्या भारतीय जनता पक्षात दाखल झाल्या. २०१५च्या दिल्ली विधानसभा निवडणुकीत त्यांनी पक्षाच्या मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार म्हणून असफल निवडणूक लढवली. २२मे २०१६ रोजी बेदी यांना पाँडिचेरीच्या लेफ्टनंट गव्हर्नर म्हणून नेमण्यात आले. निवृत्तीनंतर (अण्णा हजारे) यांच्या लोकपालासाठीच्या आंदोलनात त्या सहभागी झाल्या होत्या.

टेनिस कोर्टवर किरण बेदी यांची ब्रिज बेदी यांच्याशी भेट झाली. त्यांचा विवाह १९७२ साली झाला. त्याच वर्षी त्या आयपीएसची परीक्षा उत्तीर्ण झाल्या. ब्रिज बेदी हे किरण बेदी यांना सरकारी नोकरीसाठी प्रोत्साहित करीत राहिले. बेदी यांच्या मुलीचे नाव सायना असे आहे. (साभार : विकीपीडिया)

# संगीतकार वसंत देसाई




सुप्रसिद्ध संगीत दिग्दर्शक अशी वसंत कृष्णाजी देसाई यांची ओळख राहिली आहे. त्यांचा जन्म ९ जून रोजी सोनवडे (ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग) येथे झाला. त्यांचे वडील कृष्णाजी व आई मुक्ताबाई. मुक्ताबाई या आबा भास्कर परुळेकर या प्रसिद्ध कीर्तनकारांच्या कन्या. त्यामुळे लहानपणापासून वसंत यांच्या कानावर भजन, कीर्तन, दशावतारी संगीत आले व त्याची गोडीही लागली.

वसंत देसाई यांचे शालेय शिक्षण गावीच झाले. सर्कशीत जावे असे त्यांना लहानपणी वाटत होते. म्हणून ते कोकणातून कोल्हापुरास त्यांचे काका नरहरी यांच्याकडे आले, परंतु सर्कशीत न जाता प्रभात फिल्म कंपनीत गेले. मूकपटांतून किरकोळ भूमिकाही त्यांनी केल्या. १९३०मध्ये प्रभातच्या खूनी खंजर या मूकपटात त्यांना छोटी भूमिका मिळाली. त्याच सुमारास प्रभात फिल्म कंपनीच्या अयोध्येचा राजा या पहिल्या बोलपटात त्यांनी संगीतदिग्दर्शक गोविंदराव टेंबे यांचे साहाय्यक म्हणून काम केले, तर १९३४ साली प्रभात फिल्म कंपनीचे कोल्हापुराहून पुण्यास स्थलांतर झाल्यावर वसंतरावांनी केशवराव भोळे आणि मा. कृष्णराव फुलंब्रीकर यांच्यासारख्या संगीत-अभ्यासकांबरोबर साहाय्यक म्हणून काम केले. त्यांच्या सहवासात राहून त्यांनी गाण्यातील स्वर, तान, मुरकी इ. संगीत-विशेष संपादन केले व रसानुकूल भावदर्शन आपल्या गाण्यात आणण्याचे कसब दाखविले तसेच स्वतंत्र स्वररचनेचे तंत्रही त्यांनी हाताळले.

कोल्हापुरातील वास्तव्यात वसंतराव गायन समाज देवल क्लब या संगीत संस्थेत जात असत. तेथे त्यांना शास्त्रीय संगीतातील दिग्गज उस्ताद अलाउद्दीनखाँ, उस्ताद अब्दुलकरीमखाँ, उस्ताद मंजीखाँ आणि रामकृष्णबुवा वझे यांचा सहवास लाभला. याचाही परिणाम त्यांची शास्त्रीय संगीतातील रूची वाढण्यात झाला.

प्रभातच्या संत ज्ञानेश्वर आणि संत सखू या गाजलेल्या चित्रपटांच्या काही चाली व बरेचसे पार्श्वसंगीत वसंत देसाई यांचे आहे. त्याच वेळी देसाई यांनी प्रभात फिल्म कंपनीच्या चित्रपटांसाठी पार्श्वगायनही केले व चित्रपटांतून भूमिकाही ते करीत होते. प्रभातच्या धर्मात्मामधील राणू महार आणि संत ज्ञानेश्वरमधील भैरू गाडीवान या त्यांच्या विशेष लक्षात राहण्यासारख्या भूमिका होत. हलक्याफुलक्या संगीतापेक्षा रागदारी संगीतामध्ये त्यांना विशेष गोडी असल्यामुळे प्रभात फिल्म कंपनीत असतानाच त्यांनी इनायत खाँसाहेब यांच्याकडे शास्त्रोक्त संगीताची साधना केली तसेच ख्यातनाम गवयांच्या गाण्यांच्या ध्वनिमुद्रिका वारंवार ऐकून व विविध घराण्यांच्या गायकांच्या बैठकांना जाऊन संगीतातील मर्म समजावून घेण्याचेही त्यांनी बरेच प्रयत्न केले. त्यांच्या गाण्याच्या बैठकीही त्या काळात होत असत. १९३९मध्ये ते प्रभात फिल्म कंपनी सोडून मुंबईला आले.

व्ही. शांताराम यांच्या राजकमल कला मंदिराच्या शकुंतला चित्रपटापासून खऱ्या अर्थाने त्यांना स्वतंत्र संगीतदिग्दर्शनाची संधी मिळाली. त्यानंतर ३२ वर्षे त्यांनी अनेक मराठी व हिंदी चित्रपट, नाट्यकृती, बालगीते, समरगीते यांना उत्कृष्ट संगीत दिले. संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनाप्रसंगी त्यांनी चाल दिलेली 'घन:श्याम सुंदरा' ही भूपाळी म्हटली गेली. १९६२मधील चीनच्या आक्रमणाच्या वेळी देसाई यांनी स्वरबद्ध केलेले 'जिंकू किंवा मरू' हे ग.दि. माडगूळकर यांनी लिहिलेले समरगीत विशेष लोकप्रिय ठरले. त्यांनी संगीत दिलेल्या अनेक चित्रपटांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सन्मान मिळाले आहेत. १९७१ साली त्यांना भारत सरकारने पद्मश्री पुरस्काराने गौरविले. १९७३-७४मध्ये त्यांना मराठी नाट्य परिषदेच्या अध्यक्षपदाचा मान मिळाला. राज्यपालांनी त्यांची नियुक्ती १९७५मध्ये विधान परिषदेवर केली होती. ते अविवाहित होते. अशा या गुणी संगीततज्ञाला २२ डिसेंबर १९७५ रोजी एकसष्टाव्या वर्षी लिफ्टमध्ये अपघाती मरण आले. (साभार : मराठी विश्वकोष)

# अवघड वळणावर दरडीचा धोका

## मुरूड सर्वे येथे प्रशासनाने उपाययोजना करण्याची मागणी

**मुरूड : प्रतिनिधी**

पावसाच्या सरी कोसळण्यास सुरुवात झाली तरीदेखील तालुक्यात आपत्ती व्यवस्थापनाची सभा न झाल्याने अनेक ठिकाणी पूर, दरडी कोसळल्याच्या उपाययोजनांबाबत अद्यापही नागरिकांमधून साशंकता व्यक्त होत आहे. त्यामुळे तालुक्यातील सर्वे येथील डोंगराच्या शेजारूनच जाणाऱ्या रस्त्यावर दरडी कोसळण्याचा धोका अद्यापही कायम आहे.



सर्वे येथील डोंगराच्या शेजारूनच सर्व वाहने जात असतात. हा रस्ता मुंबई महामार्गाशी जोडला गेल्याने सतत वाहतूक सुरू असते, परंतु डोंगरावरील माती खाली आलेली असतानासुद्धा येथे दुर्लक्ष करण्यात आल्याने ऐन पावसाळ्यात येथ मोठा धोका निर्माण होणार आहे.

मुरुड तालुक्यातील म्हाळुंगे, राजपुरी, काकलघर, सावली आदी ग्रामपंचायती अतिवृष्टीमुळे धोक्याच्या रडारवर आहेत. यासाठी प्रशासनाकडून पावसाळ्याआधीच उपाययोजना होणे खूप गरजेचे आहे.

त्याचप्रमाणे सावली ग्रामपंचायतीमधील काही भाग हा डोंगराच्या अगदी लगतचा आहे, तर राजपुरी कोळीवाडा येथील बहुसंख्य घरेही डोंगरावर आहेत. तालुक्यातील काही रस्ते जंगल भागातून तसेच डोंगराशेजारील रस्त्यावरून जात असतात. पावसाळ्यात डोंगराचा एखादा भाग खाली येऊन अथवा एखादे मोठे वृक्ष उन्मळून पडल्यावर प्रशासन जागृत असणे खूप आवश्यक असते.

याबाबत नायब तहसीलदार संजय तवर यांनी सांगितले की, तहसील कार्यालयामार्फत आपत्कालीन सभा घेतली असून यामध्ये विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते. सार्वजनिक बांधकाम खाते तसेच महावितरण विभागास योग्य त्या सूचना पावसाळी कालावधीसाठी देण्यात आलेल्या आहेत.

# रायगडात ओल्या काजूगरांचा हंगाम सरला

### भिजवलेल्या परिपक्व बियांतील गरांची विक्री

**पाली : प्रतिनिधी**



ओल्या काजूगराचा हंगाम आता सरला आहे. सध्या बाजारात उपलब्ध होणारे काजूगर म्हणजे परिपक्व झालेल्या बियांतील काजूगर आहेत कारण कोवळ्या बियांतील काजूगरांचा हंगाम संपला असून काजूच्या बियांना फळधारणा झाली आहे. सध्या हे काजूगर २०० ते २५० रुपये शेकड्याने विकले जात आहेत. कोवळ्या काजूच्या बियांतील काजूगर समजून खवय्ये ते खरेदी करीत आहेत, मात्र कोवळ्या बियांतील काजूगरांच्या तुलनेत परिपक्व काजूगराची चव वेगळी आहे.

सध्या मोठ्या प्रमाणात पर्यटक रायगड जिल्ह्यात दाखल होत आहेत. हे पर्यटक आवर्जून काजूगर खरेदी करताना दिसत आहेत. अवकाळी पाऊस व खराब हवामान यामुळे यंदा काजू व आंबा पिकावर प्रतिकूल परिणाम झाला आहे. उत्पादनसुद्धा घटले आहे. आदिवासी महिला हा रानमेवा विकायला घेऊन येतात. सध्या दर चांगला मिळत असल्याने आनंदी आहेत. माणगाव, श्रीवर्धन, म्हसळा, तळा आदी ठिकाणी काजूगर शेकड्याने मिळतात, तर पाली, रोहा, पेण आदी ठिकाणी अर्धे काजूगर वाट्यावर मिळतात. २० रुपयांनी मिळणार वाटा आता ५० रुपयाने मिळत आहे. भाव जास्त असला तरी खवय्ये मात्र चढ्या भावानेदेखील काजूगर खरेदी करत आहेत.

मे महिन्यापर्यंत ओल्या कजुगराचा हंगाम सुरू असतो, मात्र काजूचे फळ तयार झाल्यावर ओले काजूगर मिळत नाहीत. काजूगर विकून आदिवासींच्या हाती चांगले पैसे देखील मिळतात.

# नेरळच्या जिजामाता तलावातील कारंजा गायब

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील नेरळ ग्रामपंचायतीमधील राजमाता जिजामाता तलावातील कारंजा गायब झाला आहे. हा कारंजा गेला कुठे? असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत.

१९९८मध्ये तत्कालीन सरपंच सावळाराम जाधव यांनी नेरळ ग्रामपंचायतीच्या तलावाचे सुशोभिकरण प्रथमच केले. तलावातील सर्व गाळ माती काढून तलाव खोल करण्यात आला आणि नंतर तलावाच्या मध्यभागी कारंजा बसविण्यात आला. राजमाता जिजामाता तलाव असे



नामकरण करण्यात आलेल्या या तलावात दोन वर्षांनी खासगी व्यक्तींच्या माध्यमातून बोटिंगची व्यवस्था करण्यात आली. त्यानंतर तलावातील पाण्यात मध्यभागी असलेला कारंजा आणि त्या कारंजाचे आजूबाजूने करता येणारी पाण्यातून सैर यामुळे नेरळ गावातील हा ग्रामपंचायत तलाव नेरळकरांचे आकर्षण बनले.

राजमाता जिजामाता तलाव नेरळ ग्रामपंचायतचे ब्रँड बनल्याने या ठिकाणी तलावातील गाळ काढण्याचे काम आणि तलावाचे सुशोभिकरण आदी कामे करण्याची परवानगी डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानकडून घेण्यात आली. प्रतिष्ठानचे माध्यमातून नेरळ ग्रामपंचायतीमधील तलावाचे सुशोभिकरण त्यात बसण्यासाठी आकर्षक बैठक व्यवस्था आणि आजूबाजूला लोखंडी रेलिंग बसविण्यात आले.

तलावाच्या सुशोभीकरणासाठी आमदार महेंद्र थोरवे यांच्या माध्यमातून निधी देण्यात आला होता. या राजमाता जिजामाता तलावाचे आकर्षण असलेला पाण्याच्या मध्यभागी असलेला कारंजा गेली काही दिवस दिसेनासा झाला आहे. त्यात तलावातील पाणी खाली करून कारंजा काढण्यात आला असल्याचे दिसून येत आहे.

**सध्या जिजामाता तलावाच्या नूतनीकरणाचे काम सुरू आहे. हे काम पूर्ण होत असताना तलावातील कारंजे पूर्ववत होतील.**

**–उषा पारधी,**
**सरपंच, नेरळ ग्रामपंचायत**

# वरसोली समुद्रकिनारी स्वच्छता मोहीम

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

८ जून हा दिवस जागतिक महासागर दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या दिनाचे औचित्य साधून वरसोली येथील समुद्रकिनारी दी लाईफ फाउंडेशन आणि पीएनपी होली चाईल्ड सीबीएसई स्कूल अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छता मोहीम राबविण्यात आला.



या उपक्रमांतर्गत पीएनपी होली चाईल्ड सीबीएसई स्कूलच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर करून जनजागृती करीत सर्व उपस्थितांसोबत पर्यावरण संरक्षण व संवर्धनाबाबत प्रतिज्ञा घेतली, तसेच स्वच्छता मोहिमेसाठी समुद्रकिनारा आणि त्या सभोवतालचा परिसर स्वच्छ तसेच प्लास्टिकमुक्त करण्यात आला. या वेळी संकलित कचरा हा व्यवस्थितपणे वरसोली ग्रामपंचायतीच्या स्वच्छता विभागाच्या स्वाधीन करण्यात आला.

या समुद्र स्वच्छता कार्यक्रमात पीएनपी होली चाईल्ड सीबीएसई स्कूलच्या मुख्याध्यापिका वेलैयमाल अलियास वेनी, उपमुख्याध्यापिका सादा सबस्कर, सर्व शिक्षक, विद्यार्थी सहभागी झाले होते. यावेळी दी लाईफ फाऊंडेशनचे प्रकल्प व्यवस्थापक शिलानंद इंगळे व सामाजिक कार्यकर्ते प्रणय ओव्हाळ, राखी राणे आणि स्वयंसेवकांनी मेहनत घेतली.

# चिलठण सरपंचासह कार्यकर्ते राष्ट्रवादीत दाखल

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जनसंपर्क कार्यालयात पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत जाहीर पक्षप्रवेशाचा कार्यक्रम पार पडला. या वेळी चिलठण ग्रामपंचायतचे सरपंच मिनिष गायकर आणि ग्रामपंचायत सदस्य दत्तात्रय ओव्हाळ हे राष्ट्रवादीत सहभागी झाले.




या वेळी प्रदेश सरचिटणीस भरत भगत, प्रदेश सरचिटणीस अशोक भोपतराव, युवक जिल्हाध्यक्ष अंकित साखरे, महिला तालुकाध्यक्ष रंजना धुळे, युवक तालुकाध्यक्ष अ‍ॅड. स्वप्नील पालकर, जिल्हा सरचिटणीस राजेंद्र निगुडकर, बाबू पोटे आदी उपस्थित होते.

याचबरोबर बोरगावमधील कैलास धस, शांताराम येलकर, वामन पाटील, वसंत पाटील, पांडुरंग दळवी, रोशन पाटील, योगेश पाटील, अविनाश देशमुख, नंदकुमार पाटील, रोहीत पाटील यांनी तसेच होनाड ग्रुप ग्रामपंचायतीमधील चिंचवली–गोहे गावातील वामन पाटील, विजय पाटील, भरत पाटील, प्रतिक पाटील, रोहीत ठोंबरे, हर्षद ठोंबरे, तानाजी पाटील, भगवान पाटील, नितीन वाघमारे, रोहन शिंदे, मारुती पाटील, अजय पडवळ, शंकर वंजारी, रोहीदास पाटील, वेंदांत पाटील, सतीश जाधव यांनी राष्ट्रवादीत प्रवेश केला.

# कर्जत–नेरळ रस्त्यावरील सहा दुकाने चोरट्यांनी फोडली

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत–नेरळ रस्त्यावरील देऊळवाडीजवळील, डी मार्टसमोरील एकूण पाच दुकाने आणि वांजळे येथील एक अशी सहा दुकाने चोरट्यांनी फोडली. यामधून रोख रक्कम व किरकोळ ऐवज चोरट्यांनी पळवला.



शनिवारी पहाटे ३ वाजण्याच्या सुमारास पाच ते सहा जणांनी दुचाकीवरून येऊन शटर उखडून चोरी केली आहे. यामध्ये आपले सरकार सेवा केंद्र, मैत्रीण ब्युटी पार्लर, गादी कारखाना, केक शॉप तसेच वांजळे येथील हडप वडापाव या दुकानांमधून रोख तर काही ठिकाणी किरकोळ ऐवज चोरीला गेला आहे. याबाबत कर्जत पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल झाला असून कर्जत पोलीस ठाण्याच्या वतीने अधिक तपास सुरू आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत जमीन मालक जनार्दन कावळ्या घोगरे व इतर यांचेकडून विकत घेण्याच्या विचारात आहे. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे:

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - भेरले, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड**

| अनु क्र. | सर्व्हे / गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे-आर-पॉ. | आकार रु.- पै. |
|---|---|---|---|---|
| १) | १०६ | ३ | ० हे - ०६ आर - ८० पॉ. | ० - ४१ |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहीवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यावर ७ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, दावा न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशील सदर मिळकतीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरून सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**अ‍ॅड. विजय रामराव सुरडकर,**
**पत्ता :**४०३,श्री. आराधना कॉ.ऑप. होऊ. सोसा.,से-५,प्लॉट नं .३६, सानपाडा ,नवी . मुंबई :४००७०५, **फो :**९८७००९९२८४

**ठि.: पनवेल**
**दि. 09/06/2024**




**खोपोली : भाजपच्या महिला शहराध्यक्ष शोभा काटे यांचा वाढदिवस विविध उपक्रम राबवून साजरा करण्यात आला. भाजप शहराध्यक्ष रमेश रेटरेकर यांनी काटे यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांचे अभीष्टचिंतन केले. या वेळी उपाध्यक्ष दिलीप पवार, कामगार आघाडीचे जिल्हा नेते सूर्यकांत देशमुख, सरचिटणीस अजय इंदुलकर, चिटणीस विनायक माडपे, ओबीसी सेलचे सुनील नांदे व इतर पदाधिकारी उपस्थित होते.**



**नागोठणे : खडक आळीतील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तात्या खंडागळे यांच्या मार्गदर्शनाखाली ज्वाला ग्रुप खडकआळी यांच्या वतीने ग्रामदैवत श्री जोगेश्वरी माता मंदिरात श्री सत्यनारायण पुजेचे आयोजन करण्यात आले होते. पुजेला बसायचा मान ग्रामपंचायत सदस्य सचिन ठोंबरे व संचिता सचिन ठोंबरे या उभयंताना दिला गेला. दर्शन घेण्यासाठी श्री जोगेश्वरी माता विश्वस्त समिती सचिव तथा राष्ट्रवादीचे नेते भाईसाहेब टके, भाजप युवा नेते प्रसाद भोईर, नागोठणे सदस्य डॉ. मिलिंद धात्रक, अ‍ॅड. प्रकाश कांबळे उपस्थित होते.**


## RSPM'S

SATYAGRAHA COLLEGE OF EDUCATION, NAVI MUMBAI

(NCTE, Govt. Recognized & Affiliated to Mumbai University)

WALK-IN INTERVIEW

FOR TEACHING AND NON-TEACHING STAFF

A reputed College of Education is seeking candidates for the following positions:

**Teaching Staff:**
- Assistant Professor in Education in method of English,Mathematics, Computer Science, Physics Technology, Biology, Sanskrit, Pali, Geography, Social Science

**Non-Teaching Staff:**
- Librarian, Clerk, Computer Operator, Lab Assistant
- Multipurpose Assistant, Bus Driver

**Part-Time Coaches:**
- Table Tennis, Badminton, Basketball, Handball, Gymnastics, Athletics, Football
- Chess, Hockey, Band Master, Cricket, Music, Art, Craft.

**Qualifications and Qualities:**
1. Post Graduate + M.Ed + NET/SET/Ph.D
2. Proficiency in teaching in English, Marathi, and Hindi is a must.
3. Working knowledge of computer.

**Salary:** As per UGC, Mumbai University and Govt. of Maharashtra Rule. College Timings: Morning and Day Sessions

**Venue and Schedule for Walk-in Interviews:** Rahul Shikshan Prasarak Mandal Supparak Bhavan, Plot No. 52, Sector-19, Kharghar, Navi Mumbai. From Sunday, 9th June 2024 to 15th June 2024, starting from 10 A.M. onwards.

**SD/-**
**Secretary**
Rahul Shikshan Prasarak Mandar
Supparak Bhavan, Plot No. 52, Sector - 19. Kharghar, Navi Mumbai



## PUBLIC NOTICE

My client Vikram Patel is negotiating for sale of his property situated at Mauje Shirdhon, Taluka Panvel, District Raigad (admeasuring 0.37.20 Gunthas as per the 7/12 Extract dated 18th December 2019 in accordance with the Ferfar (Change) No.5293 dated 28th January 2017), ("said property") on "as is where is" and "as is what is" basis.

Any person having any claim, right, title and/or interest in respect of the said property by way of inheritance, share, sale, mortgage, lease, lien, license, gift, possession or encumbrances or otherwise, or any claim, demand or objection thereto of any nature whatsoever, is required to intimate to the undersigned in writing with acknowledgement due at the following address, within 21 days from the publication hereof,

of his/her/their or it's such claim, demand, entitlement of objection with all supporting documents, failing which, my client shall agree to sell and complete the transaction of sale of said property, as if no person/s and/or party has any claim, demand or objection thereto or any part thereof, and the same shall be treated as waived and not binding on my client or any person claiming through or under him, and no person or party will be considered as having claim, demand or objections of any nature whatsoever in connection with the said property or any part thereof, which please note.

Dated this 8th day of June 2024

**SD/-**
**Mrs. Divya D. Jain**
Advocate for Vikram A. Patel 139, Jolly Maker Chamber-II, Nariman Point, Mumbai-400 021
Mobile- 9833025343

## निवडक

### रिक्षात विसरलेली बॅग केली परत

**नवी मुंबई** : सानपाडा येथील डी मार्टमधून रिक्षात बसलेल्या महिलेची बॅग रिक्षात विसरली होती. रिक्षाचालकाने ही बॅग सानपाडा पोलीस ठाण्यात जमा केली. पोलिसांनी त्यांच्या प्रामाणिकपणाचे कौतुक केले. रिक्षा संघटेनच्या माध्यमातून त्यांचा सन्मान करण्यात आला. सानपाडा सेक्टर ८ परिसरात जाण्यासाठी महिला प्रवीण रणखांबे यांच्या रिक्षात बसल्या, परंतु रिक्षातून उतरताना त्या आपली बॅग विसरल्या होत्या. काही वेळाने ही बाब रिक्षाचालक रणखांबे यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी नवी मुंबई शिव वाहतूक सेना रिक्षाचालक मालक सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष दिलीप आमले यांना माहिती दिली. आमले यांनी बॅग तत्काळ जवळील पोलीस ठाण्यात जमा करण्याची सूचना त्यांना केली. त्यानुसार रणखांबे यांनी बॅग जमा केली. त्यांच्या प्रामाणिकपणाचे सर्वत्र कौतुक होत आहे.




### जयश्री फाउंडेशनतर्फे वृक्षारोपण

**नवी मुंबई** : जयश्री फाउंडेशन व टॉर्क कमोडिटी प्रा.लि.यांच्या संयुक्त उपस्थितीने जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून ज्वेल ऑफ नवी मुंबई येथे वृक्षारोपण करण्यात आले. वाढत्या तापमान व काळाची गरज लक्षात घेऊन मागील चार वर्षांपासून जयश्री फाउंडेशनमधील युवकांच्या प्रयत्नांतून शेकडो झाडे लावण्यात आली व त्यांची काळजीदेखील घेण्यात आली. या कार्यक्रमाचे यजमान सहाय्यक पोलीस निरीक्षक डॉ. विशाल माने, अॅड. छाया तारळेकर, टॉर्क कमोडिटीजमधील कर्मचारी तसेच जयश्री फाउंडेशनचे सदस्य उपस्थित होते.



### पाच वर्षांच्या मुलासह आई बेपत्ता



**पनवेल** : पाच वर्षांच्या मुलासह आई घरातून कोणास काही एक न सांगता निघून गेल्याने ती हरविल्याची तक्रार तिच्या पतीने पनवेल शहर पोलीस ठाण्यात दिली आहे. मनिषा सोनू पोवल (२७, रा. करंजाडे) असे या महिलेचे नाव असून रंग गोरा, अंगाने मध्यम, उंची पाच फूट दोन इंच, डोळे काळे आहेत. सोबत तिचा पाच वर्षीय मुलगा नक्ष आहे. त्यांना हिंदी भाषा अवगत आहे. या दोघांबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी (२७४५२३३३) किंवा पोलीस हवालदार युवराज म्हात्रे यांच्याशी संपर्क साधावा.

# मुदत संपूनही नवी मुंबईत विकासकामे सुरूच

## चौकांच्या अर्धवट कामामुळे वाहतूक कोंडीची शक्यता

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

पावसाळा तोंडावर असतानाही अद्याप चौकांचे कॉंक्रिटीकरण व पामबीच मार्गावरील मायक्रोसर्फेसिंगची कामे सुरूच आहेत. चौकांच्या कॉंक्रिटीकरणाच्या अर्धवट कामामुळे त्या ठिकाणी डांबरीकरण केले जात आहे. त्यामुळे ऐन पावसाळ्यात त्या ठिकाणी खड्डे पडण्याची भीती असून अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

नालेसफाईची कामे ९५ टक्के पूर्ण झाल्याचा दावा पालिका करीत असताना शहरात विविध विकासकामांची शहरात अभियंता विभागाकडून मोठ्या प्रमाणात विकासकामे चालू असून जवळजवळ ७५० विकासकामे सुरू आहेत. त्यातील रस्ते व चौक कॉंक्रिटीकरणाची कामे अर्धवट आहेत. ज्या ठिकाणी कामे अर्धवट आहेत, त्या ठिकाणी कॉंक्रिटीकरण थांबवून डांबरीकरण करण्यात येत आहे. अर्धवट कामांमुळे पावसाळ्यात वाहतूक कोंडी होण्याची दाट शक्यता आहे.



विविध चौकांचे कॉंक्रिटीकरण तसेच पामबीच मार्गावर मायक्रोसर्फेसिंग, नालेदुरुस्ती, गटारे यांसह पालिकेच्या विविध इमारती यांची कामे सुरू आहेत. रस्ते दुरूस्ती, मल:निसारण वाहिन्या टाकण्यासाठीची खोदकामे यासह विविध कामे केली जात असून ती तात्काळ थांबवणे आवश्यक आहे. पामबीच मार्गावर मायक्रोसर्फेसिंगची कामे करण्यात येत आहेत. पावसाळा सुरू होण्याची स्थिती असताना अद्याप खोदकामे सुरूच असल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

> **पामबीच मार्गावरची मायक्रोसर्फेसिंगची कामे पुढील दोन-तीन दिवसांत पूर्ण होतील. चौक कॉंक्रिटीकरणाच्या ठिकाणी पावसाळ्यात वाहतुकीसाठी अडचण येऊ नये यासाठी ठेकेदाराकडूनच डांबरीकरण करून घेण्यात येत आहे. त्याचा खर्च ठेकेदारच करणार आहे. पावसाळ्यानंतर कार्यादेशाप्रमाणे चौकांच्या कॉंक्रिटीकरणाचे काम ठेकेदाराकडून पूर्ण करून घेण्यात येणार आहे.**
>
> **-शिरीष आरदवाड, शहर अभियंता**

## पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या निवडीचा नवी मुंबईत जल्लोष



**नवी मुंबई : बातमीदार**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची एनडीएच्या संसदीय नेतेपदी निवड झाली असून ते रविवारी पंतप्रधानपदाची तिसऱ्यांदा शपथ घेणार आहेत. याचा जल्लोष नवी मुंबई भाजपच्या वतीने जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माजी खासदार डॉ. संजीव नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये शनिवारी (दि.८) करण्यात आला.

वाशी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात मोठ्या संख्येने जमलेले कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी एकमेकांना मिठाई भरवत आनंद व्यक्त केला. संगीताच्या तालावर कार्यकर्त्यांनी नृत्यही केले. शिवाजी चौक या वेळी भाजपच्या झेंड्यांनी बहरून गेला होता. या वेळी डॉ. संजीव नाईक यांनी, मोदीजी तिसऱ्यांदा पंतप्रधानपदी विराजमान होणार असून देशाची सेवा करण्यास सज्ज झाल्याचे सांगितले. आगामी पाच वर्षांमध्ये विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी काम सुरू होईल. मोदीजींच्या नेतृत्वाखालील सरकार आपल्या पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करून पुढील पाच वर्षांची पायाभरणीदेखील करेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. लोकसभा निवडणुकीमध्ये संविधान बदलणार असल्याचा अपप्रचार विरोधकांनी केला. मोदीजींचे सरकार पुन्हा येणार नाही, असा दावा विरोधक करीत होते, परंतु तिसऱ्यांदा मोदी सरकार स्थापन होणार आहे. विरोधक आरोप करीत राहतील, सत्ताधारी म्हणून जनतेला दिलेल्या वचनांची पूर्तता करण्याचे काम आम्ही करू. लोकसभा निवडणुकीत राहिलेल्या उणिवा दूर करून आगामी विधानसभा निवडणुकीत घवघवीत यश प्राप्त करू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या आनंदोत्सवात अनंत सुतार, रवींद्र इथापे, दशरथ भगत, माधुरी सुतार, नेत्रा शिर्के, नवीन गवते, अमित मढवी, अरुण पडते यांच्यासह कार्यकर्ते, पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.




## ऑलिम्पियाडमध्ये नवी मुंबईचे विद्यार्थी अव्वल

**नवी मुंबई : बातमीदार**

२०२३-२४च्या एसओएफ ऑलिम्पियाड परीक्षेत नवी मुंबईतील तीन विद्यार्थ्यांनी अव्वल क्रमांक पटकावला आहे. युरो स्कूल-ऐरोली येथील इयान रिचर्ड सॅम्युअल या प्रथम श्रेणीतील विद्यार्थ्याने आंतरराष्ट्रीय गणित ऑलिम्पियाडमध्ये प्रथम क्रमांक मिळवून सुवर्णपदक आणि गुणवत्ता प्रमाणपत्र मिळवले.

न्यू होरायझन पब्लिक स्कूलमधील द्वितीय श्रेणीतील विद्यार्थी वेद मोरे याने आंतरराष्ट्रीय गणित ऑलिम्पियाडमध्ये प्रथम क्रमांक पटकावला, आंतरराष्ट्रीय सुवर्णपदक आणि गुणवत्ता प्रमाणपत्र प्राप्त केले. दिल्ली पब्लिक स्कूल, पनवेल येथील तृतीय श्रेणीतील विद्यार्थ्याने श्रीपान साहाने आंतरराष्ट्रीय सामाजिक विज्ञान ऑलिम्पियाडमध्ये तिसरा क्रमांक मिळवून आंतरराष्ट्रीय कांस्यपदक आणि गुणवत्ता प्रमाणपत्र मिळविले.

सायन्स ऑलिम्पियाड फाउंडेशनने २०२३-२४ या शैक्षणिक वर्षासाठी विजेते, त्यांचे शिक्षक आणि मुख्याध्यापकांना सन्मानित करण्यासाठी नवी दिल्ली येथे पुरस्कार सोहळ्याचे आयोजन केले होते. सात वेगवेगळ्या ऑलिम्पियाड परीक्षांमध्ये भाग घेतलेल्या इयत्ता पहिली ते १२वीपर्यंतच्या जागतिक स्तरावरील पहिल्या तीन रँकधारकांना गौरविण्यात आले. भारताचे माजी सरन्यायाधीश, न्यायमूर्ती दीपक मिश्रा आणि प्रसिद्ध लेखक आणि पटकथा लेखक चेतन भगत उपस्थित होते.

## आवक कमी झाल्याने कांद्याच्या दरात वाढ



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

वाशीतील एपीएमसी बाजारात कांद्याच्या दराने पुन्हा उसळी घेतली असून प्रतिकिलो दोन ते तीन रुपयांची दरवाढ झाली आहे. बाजारात सध्या आवक कमी होत आहे, तसेच बहुतांश उत्तम दर्जाचे कांदे साठवणूक केल्याने कांद्याच्या दरात वाढ होत आहे, अशी माहिती व्यापाऱ्यांनी दिली आहे.

एपीएमसीत प्रतिकिलो २२-२५ रुपयांनी विक्री होणारे कांदे आता २५ ते २९ रुपयांवर गेले आहेत.

यंदा कांद्याचे उत्पादनही कमी आहे. उष्णतेमुळे १० ते २० टक्के कांदा खराब होत आहे, तर दुसरीकडे उत्तम दर्जाचे कांदे साठवणूक करून ठेवले आहेत. सध्या कांद्याची आवक कमी होत असून गुरुवारी बाजारात अवघ्या ६८ गाड्या दाखल झाल्या आहेत. त्यामुळे कांद्याच्या दरात दोन ते तीन रुपयांनी वाढ झाली आहे, तसेच पावसामुळे शेतामधून कांदे काढण्यासाठी तसेच गाडीमध्ये शेतमाल भरण्यासाठी अडचणी येत आहेत. त्यामुळे देखील बाजारात कांद्याची आवक कमी झाली आहे.

> **यंदा कांद्याचे उत्पादन कमी आहे. त्याचबरोबर उत्तम दर्जाचा कांदा साठवणूक करून ठेवला आहे आणि उष्णतेमुळेही कांदे खराब निघत आहेत. त्यामुळे यंदा कांद्याची दरवाढ होत आहे.**
>
> **-महेश राऊत, घाऊक व्यापारी, एपीएमसी**

## वाशी सेक्टर १९ चौकाचे माता रमाई भिमराव आंबेडकर नामकरण



**नवी मुंबई : बातमीदार**

वाशी सेक्टर १९, शालीमार हॉटेलसमोरील चौक येथे टेम्पो मालक-चालक संघ कार्यरत आहे. गेली १५ वर्षांपासून टेम्पो स्टॅण्ड बनविलेले आहे, परंतु या चौकाला कोणत्याही नावाने संबोधले जात नाही. या चौकाला माता रमाई भिमराव आंबेडकर असे नाव देण्यात यावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अनिल शिरसाठ यांनी २०१६ साली पालिकेकडे केली होती. त्यानुसार चौकाला नाव देण्यात आले आहे.

याबाबत त्यांचा सातत्याने पाठपुरावा सुरू होता. पालिकेने याबाबत निर्णय घेत अखेर पालिकेने या चौकाला माता रमाबाई आंबेडकरांचे नाव दिले आहे. या निर्णयाने टेम्पो चालक-मालक संघाने पालिकेचे आभार मानले असून वाशी सेक्टर १९ येथील चौक माता रमाबाई भीमराव आंबेडकर या नावाने ओळखला जाणार आहे.



## रोख रकमेसह मोबाईलची चोरी

**पनवेल : वार्ताहर**

घरात घुसून अज्ञात चोरट्याने रोख रकमेसह चार मोबाईल चोरून नेल्याची घटना खांदा वसाहतीमध्ये घडली आहे.

खांदा वसाहतीमधील सेक्टर १३ येथील एक्स्प्रेस विहार या ठिकाणी राहणाऱ्या पुंडलिक म्हात्रे यांच्या घराचा दरवाजा उघडा असल्याचे पाहून अज्ञात चोरट्याने घरात शिरून रोख रकमेसह चार मोबाईल चोरून नेले आहेत. याबाबतची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## सानपाडा येथे महापालिकेतर्फे जागतिक पर्यावरण दिन साजरा

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई सानपाडा येथे कै. सिताराम मास्तर उद्यानात नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने पर्यावरण दिन साजरा करण्यात आला. डी वॉर्डचे विभाग अधिकारी (उपायुक्त) भरत धांडे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या वेळी वसुंधरेची शपथ घेण्यात आली.



ज्येष्ठ नागरिक संघाचे व हरियाली संस्थेचे अध्यक्ष मारुती कदम यांनी, पर्यावरण दिनाचे महत्त्व फार मोठे आहे. आज भारतात ५३ टक्के तापमान वाढीचे प्रमाण पोहचले आहे. ही बॉर्डर लाईन असून धोक्याची घंटा आहे. त्या दृष्टिकोनातून वृक्षारोपण करणे फार गरजेचे आहे, असे सांगितले. या वेळी शिवसेनेचे नवी मुंबईचे उपजिल्हाप्रमुख मिलिंद सूर्याराव, सावंत, मराठा विकास प्रतिष्ठानचे सहसचिव मारुती विश्वासराव, सामाजिक कार्यकर्ते रणवीर पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. अजय पवार यांनी सर्वांचे आभार मानले.

# घणसोलीतील बेघर निवारा केंद्र कार्यान्वित



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई महानगरपालिकेमार्फ दीनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानांतर्गत १५ मार्चपासून प्लॉट क्रमांक २४०, सेक्टर ४, घणसोली येथे बेघर निवारा केंद्र सुरू करण्यात आले आहे.

या बेघर निवारा केंद्राची क्षमता १०३ लाभार्थी इतकी असून याठिकाणी बेघर व्यक्तींसाठी चहा, नाष्टा, दोन वेळचे जेवण, अॅक्वागार्ड मशीनचे पिण्याकरिता पाणी, गादी, उशी, चादर, सामान ठेवण्यासाठी लॉकर तसेच मनोरंजनाकरिता टिव्ही संच आदी साहित्य विनामूल्य उपलब्ध करुन देण्यात आले आहे. या केंद्रामध्ये पुरूष, महिला, दिव्यांग व्यक्ती व वृद्ध यांच्याकरिता राहण्याची स्वतंत्र व्यवस्था उपलब्ध आहे.

या बेघर निवारा केंद्राची संपूर्ण माहिती पोलीस आयुक्त, नवी मुंबई आणि महानगरपालिकेच्या आठही विभागांचे विभाग अधिकारी यांना देण्यात आलेली आहे.

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोणीही बेघर रस्त्यावर राहू नये या दृष्टीने रस्त्यावर बेघर व्यक्ती (वृद्ध, महिला, मुले व दिव्यांग व्यक्ती) आढळून आल्यास त्याची माहिती नमुंमपा समाज विकास विभागातील राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानाचे व्यवस्थापक तुषार पवार यांस (९८८१६३६१६८) अथवा आस्था सामाजिक विकास सेवा संस्थेचे व्यवस्थापक राहुल वाढे यांस (८६६९३९३३०९) या क्रमांकावर संपर्क साधून द्यावी, असे आवाहन नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.



## नवी मुंबईच्या पलांशा अग्रवालला नीट परीक्षेत प्रथम रँक

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई शाखेतील आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेडची विद्यार्थिनी पलांशा अग्रवाल हिने नीट यूजी २०२४ परीक्षेत ऑल इंडिया प्रथम रँक मिळविला आहे. तिला ७२० पैकी ७२० गुण मिळवले आहेत.

पलांशा तिच्या यशाचे श्रेय तिच्या संकल्पनांची कठोर समज आणि शिस्तबद्ध अभ्यास कार्यक्रमाचे काटेकोर पालन याला देते. 'आकाश'ने मला दोन्ही प्रकरणांमध्ये मदत केल्याबद्दल मी कृतज्ञ आहे. या कामगिरीबद्दल पलांशाचे अभिनंदन करताना, आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेडचे मुख्य शैक्षणिक आणि व्यवसाय प्रमुख अमित सिंग राठोड यांनीही या कामगिरीबद्दल विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# नवी मुंबईत बल्लाळेश्वर पतसंस्थेचा रौप्य महोत्सव सोहळा



**नवी मुंबई : बातमीदार**

बल्लाळेश्वर सहकारी पतसंस्था, मुंबई या संस्थेचा रौप्य महोत्सवी सोहळा गुरुवारी (दि.६) संस्थेचे अध्यक्ष आनंद गावडे यांच्या अध्यक्षतेखाली वाशी येथील विष्णूदास भावे नाट्यगृहात झाला.

या वेळी महाराष्ट्र राज्य सहकारी संस्थेचे वरिष्ठ निबंधक श्रीकृष्ण वाडेकर यांच्या हस्ते रौप्य महोत्सवी वर्ष सांगता सोहळ्यात स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक शंकर पिंगळे, साईप्रेरणा को. ऑप. क्रेडीट सोसायटीचे संस्थापकीय अध्यक्ष देवदास डोंगरे, बल्लाळेश्वर सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष आनंद गावडे, संचालक व स्मरणिकेचे संपादक वसंत गावडे यांची मार्गदर्शनपर भाषणे झाली.

संस्थेचे उपाध्यक्ष भगवान शेटे, संचालक सुरेश गावडे, बाबुराव डोंगरे, मनोहर डोंगरे, दामाजी डोंगरे, रमेश धुमाळ, शरद डोंगरे, नरेंद्र तांबोळी, जगन्नाथ दाते, उमेश डोंगरे, दैवत डोंगरे, बाळासाहेब डोंगरे, प्रदिप नवले, संचालिका निता गावडे, सुनिता डोंगरे, संचालक खंडूशेठ आहेर, संचालक हर्षल आहेर, सरव्यवस्थापक संजय घोगरे व संस्थेचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमानिमित्त कमलआनंद कलामंच प्रस्तुत वारसा माझ्या महाराष्ट्राचा बालगंधर्व पुरस्कार विजेते, नवी मुंबई लावणीसम्राट आशीमिक आनंद कामठे यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले होते. बल्लाळेश्वर पतसंस्थेच्या माध्यमातून जवळपास १०० कुटुंबांना रोजगार उपलब्ध झालेला आहे. संस्थेचे विद्यमान अध्यक्ष आनंद सबाजी गावडे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना पुढील काळात जास्तीत जास्त शाखा विस्तार करणार असून उपस्थित सर्व प्रमुख पाहुण्यांचे व सभासदांचे आभार व्यक्त केले.

# खासदार सुनील तटकरेंना श्रीवर्धनमध्ये मिळालेले मताधिक्य विकासकामांची पोचपावती



पाली : पहिल्याच पावसात एसटी बसस्थानकात साचलेले पाणी.

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीत महायुतीचे उमेदवार खासदार सुनील तटकरे यांना श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघांत २९ हजार ७६९ एवढे मताधिक्य प्राप्त झाले आहे. तटकरे यांनी २००९ साली श्रीवर्धन विधानसभेची निवडणूक जिंकल्यानंतर या ठिकाणी विकासकामांचा धडाकाच लावला होता. तेव्हापासून आजपर्यंत सातत्याने विविध विकासकामे मार्गी लावण्यात आली, ज्याचा फायदा तटकरेंना झाल्याचे लोकसभा निवडणूक निकालात दिसून आले.

सुनील तटकरे यांच्यानंतर त्यांचे पुतणे अवधूत तटकरे हे श्रीवर्धन मतदारसंघातून आमदार म्हणून निवडून आले. त्या वेळेलादेखील सुनील तटकरे यांनी विविध विकासकामे सुरूच ठेवली होती. २०१९ साली विधानसभेच्या निवडणुकीत सुनील तटकरे यांच्या कन्या आदिती तटकरे याही जवळजवळ ४० हजार मतांनी विजयी झाल्या होत्या. श्रीवर्धन विधानसभा क्षेत्राच्या इतिहासात एवढ्या जास्त मताधिक्क्याने निवडून येणाऱ्या आदिती या एकमेव महिला आमदार आहेत.

सुनील तटकरे यांच्या माध्यमातून श्रीवर्धन येथे



ब्रिटिशकालीन असलेल्या कुटीर रुग्णालयाची नवीन इमारत बांधून उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा देण्यात आला आहे तसेच सर्व शासकीय कार्यालय एकाच ठिकाणी असावीत या हेतूने मध्यवर्ती प्रशासकीय भवन ही इमारतदेखील बांधण्यात आली. श्रीवर्धन येथील शासकीय तंत्रनिकेतन विद्यालयाची इमारतदेखील नवीन बांधण्यात आली. नगर परिषद हद्दीमध्ये अनेक विकास कामे करताना सर्वप्रथम नगर परिषदेची इमारत नव्याने बांधण्यात आली.

नगर परिषदेच्या इमारतीच्या बाजूला पर्यटकांसाठी पर्यटक निवासदेखील बांधण्यात आला आहे. २०१४ साली जवळजवळ १४ कोटी रुपये खर्च करून श्रीवर्धन समुद्रकिनारी सुशोभित असा धूप प्रतिबंधक बंधारा बांधण्यात आला. श्रीवर्धन शहरातील रस्ते अनेक वेळा नवीन तयार करण्यात आले, तर याच वर्षी नगर परिषदेचा जलशुद्धीकरण प्रकल्पदेखील बांधून पूर्ण झाला आहे. दरम्यान, निसर्ग चक्रीवादळाने सुशोभित बंधाऱ्यावर बऱ्याच ठिकाणी नुकसान झाले होते. त्याचेदेखील नव्याने काम करण्यात आले आहे.

याशिवाय म्हसळा, तळा तालुका, माणगाव व रोहा या ठिकाणीदेखील मोठ्या प्रमाणात कामे करण्यात आली. या ठिकाणाचे रस्ते देखील सुस्थितीत आणले गेले. सुनील तटकरे यांना मिळालेले जवळजवळ ३० हजारांचे मताधिक्य आहे. हे त्यांनी केलेल्या विकासकामांची पोचपावती आहे असेच म्हणावे लागेल.

# ‘त्या’ ई-रिक्षांचा वापर माथेरानच्या घनकचरा व्यवस्थापनासाठी करावा; स्थानिकांची मागणी

**माथेरान : रामप्रहर वृत्त**

सुप्रीम कोर्टाच्या निर्देशानुसार सध्या माथेरान येथे हातरिक्षामालकांना एकूण २० ई-रिक्षा प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्याची मंजुरी देण्यात आली आहे त्यामुळे अल्पावधीतच या ई-रिक्षा शालेय विद्यार्थी, दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक, रुग्णांना त्याचप्रमाणे पर्यटकांना सेवा देण्यासाठी सज्ज राहणार आहेत. दुसरीकडे या अगोदर प्रायोगिक तत्त्वावर ठेकेदारामार्फत सुरू असणाऱ्या नगर परिषदेच्या मालकीच्या सात ई-रिक्षा बंद कराव्या लागण्याची शक्यता आहे. या ई-रिक्षांची विक्री करण्याऐवजी त्या घनकचरा व्यवस्थापन कामी उपयोगात आणल्याची मागणी स्थानिकांकडून होत आहे.



तसे केल्यास नगर परिषदेच्या तिजोरीवर आर्थिक भार येणार नसून लाखो रुपयांची बचत यानिमित्ताने होऊ शकते. हीच आर्थिक गुंतवणूक येथील अन्य विकासकामांसाठी उपयोगी पडेल. त्याचप्रमाणे पॉईंट्स भागातील कचऱ्याचे संकलन जलदगतीने करण्यासाठी मदत होऊ शकते. त्यामुळे माथेरान हे सुंदर पर्यटनस्थळ स्वच्छतेत अग्रेसर राहण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या सात ई-रिक्षांमध्ये कोणत्याही प्रकारची प्रवासी वाहतूक न करता त्या घनकचरा व्यवस्थापनासाठी उपयोगात आणल्यास माथेरान खऱ्या अर्थाने अस्वच्छतेवर मात करू शकते. नगर परिषदेच्या अधिकारीवर्गाने जिल्हाधिकाऱ्यांना सनियंत्रण समितीला विश्वासात घेऊन पाऊले उचलल्यास नक्कीच माथेरान प्लास्टिक कचरामुक्त पर्यटनस्थळ बनेल अशी मागणी पुढे येत आहे.

**मॉनिटरिंग समितीकडे हा विषय मांडण्यात येईल. त्यानंतर पुढील आदेश प्राप्त झाल्यास निर्णय घेण्यात येईल.**

**-राहुल इंगळे, प्रशासक तथा मुख्याधिकारी माथेरान नगर परिषद**

# माथेरान घाटात अपघातग्रस्त झालेल्या दुचाकीस्वाराचा मृत्यू

**माथेरान : रामप्रहर वृत्त**

माथेरान घाटात स्कुटीला घडलेल्या अपघातात एका व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. बदलापूर येथून आलेल्या पर्यटकांच्या वाहनाला माथेरान घाटात २ जून रोजी अपघात झाला होता. या अपघातात पती-पत्नी जबर जखमी झाले होते, तर एक वर्षीय चिमुकली सुखरूप बचावली होती. दरम्यान, यामधील जखमी २३ वर्षीय विवाहित मुबतसीम दानिश बुबेरे या तरुणाचा रुग्णालयात उपचार घेत असताना मृत्यू झाला.

बदलापूर गोरेगाव येथे राहणारा मुबतसीम दानिश बुबेरे हा पत्नी नमरा बुबेरे आणि



एक वर्षीय मुलीला माथेरान फिरण्यासाठी म्हणून स्कुटीवर सकाळी आला होता. माथेरान फिरून झाल्यानंतर हे कुटुंब आपली स्कुटी घेऊन परतीच्या प्रवासाला म्हणजेच घरी निघाले होते. या वेळी वाहन मुबतसीर दानिश बुबेरे हे चालवत असताना माथेरान घाटातील जुमापट्टी येथील अवघड वळण समजले जाणाऱ्या एस टर्न येथे बुबेरे यांच्या स्कुटीला रात्री सात वाजण्याच्या सुमारास अपघात झाला.

या अपघातात मुबतसीम दानिश बुबेरे याच्या डोक्याला आणि पत्नी नमरा बुबेरे हिच्या पायाला जबर मार लागला होता. मुबतसीमला कामोठे (पनवेल) येथील एमजीएम रुग्णालयात अधिक उपचारासाठी हलवण्यात आले होते, तर पत्नी नमरा बुबेरे हिस बदलापूर येथे उपचार सुरू होते. एक वर्षीय चिमुकली ही सुखरूप बचवल्याने तिला कुटूंबाच्या स्वाधीन करण्यात आले होते. अखेर उपचारादरम्यान मुबतसीमचा मृत्यू झाला. त्यामुळे बुबेरे कुटूंबावर शोककळा पसरली आहे.

# रायगडात पर्यटनवाढीसाठी रस्ते सुधारणा, वाहतूक कोंडीचे निवारण आवश्यक



**पाली : प्रतिनिधी**

डोळ्यांचे पारणे फेडणारे निसर्गसौंदर्य, तब्बल २४० किमी लांबीचा विस्तीर्ण समुद्रकिनारा, माथेरानसारखे थंड हवेचे ठिकाण तसेच ऐतिहासिक आणि धार्मिक वारसास्थळे लाभलेला रायगड जिल्हा पर्यटनासाठी नंदनवन आहे. त्यामुळे महाराष्ट्रातीलच नव्हे; तर संपूर्ण भारतातील पर्यटक, इतिहासप्रेमी, पर्यावरण अभ्यासक व भाविक जिल्ह्यात दाखल होत असतात. त्यांना काही खराब रस्ते आणि वाहतूक कोंडीचा त्रास होतो. पर्यटकांची संख्या वाढवून यातून स्थानिकांना अधिकाधिक उत्पन्न मिळावे याकरिता रस्ते सुधारणा व वाहतूक कोंडी फोडणे यावर भर द्यावा लागणार आहे.

उन्हाळी, दिवाळी व नाताळच्या सुट्ट्यांमध्ये तसेच पावसाळ्यातही पुणे-मुंबईसह महाराष्ट्रातील निरनिराळ्या ठिकाणचे पर्यटक रायगड जिल्ह्यातील विविध ठिकाणांवर गर्दी करतात. शनिवार, रविवार वीकेण्डला फिरण्यासाठी अधिक पर्यटक बाहेर पडतात. त्यामुळे वाहतुकीवर ताण येतो.

जिल्ह्यातील विविध समुद्र किनारे व पर्यटनस्थळांवर गर्दी वाढू लागली आहे. येथील समुद्र किनारे, मंदिरे, ऐतिहासिक वास्तू, किल्ले, तीर्थक्षेत्र पाहण्यासाठी पर्यटकांसह शाळकरी व महाविद्यालयीन सहली व विद्यार्थ्यांचा ओघ प्रचंड आहे. यामुळे पर्यटनावर अवलंबून असलेले हॉटेल व्यावसायिक, खानावळी, दुकानदार यांची सध्या चलती आहे, मात्र येथे दाखल होणारे पर्यटक, भाविक रस्त्यांची दुरवस्था आणि वाहतूक कोंडीमुळे पुरते हैराण झाले आहेत. वाहतूक कोंडीमुळे पर्यटकांना तासन्तास खोळंबून राहावे लागते. परिणामी इच्छितस्थळी पोहचण्यास उशीर होतो.

पनवेल, पेण, अलिबाग, खोपोली, पाली, माणगाव, महाड, श्रीवर्धन, म्हसळा, रोहा या शहरात वाहतूक कोंडी नित्याची असते. जिल्ह्यातील अलिबागमधील नागाव, आक्षी, रेवस, वरसोली, मुरुडमधील काशिद, श्रीवर्धनमधील दिवेआगर, हरिहरेश्वर, आदगाव येथील समुद्रकिनारे पर्यटकांना भुरळ घालतात, मात्र येथील अंतर्गत रस्ते अरुंद आहेत. त्यामुळे मोठी वाहने तसेच दोन्ही बाजूने वाहन जाताना अडथळा निर्माण होतो. वारंवार तेथे वाहतूक कोंडी होत आहे. श्रीवर्धन, बोर्लीपंचतन, अलिबाग शहरातदेखील अरुंद रस्त्यामुळे कोंडी होते. त्यामुळे अनेक पर्यटकांचा हिरमोड होतो. माथेरानला जाणाऱ्या अरुंद व घाट रस्त्यामुळेदेखील कोंडी होते.

पालीतील काही अंतर्गत रस्ते खराब व अरुंद आहेत. त्यामुळे येथे प्रचंड वाहतूक कोंडी पहायला मिळते. परिणामी येथे येणाऱ्या भाविकांचे हाल होतात.

याबरोबरच वडखळ, पेण, रामवाडी, इंदापूर, कोलाड व लोणेरे आदी ठिकाणी होणाऱ्या वाहतूक कोंडीलादेखील प्रवासी व पर्यटकांना सामोरे जावे लागते. त्यामुळे पर्यटक येथील पर्यटनस्थळांकडे पाठ फिरवित आहेत. परिणामी येथील पर्यटन व्यवसायावर संकट ओढवले आहे.

महामार्ग, राज्यमार्ग व अंतर्गत रस्ते रुंद करणे, रस्त्याच्या कडेची अतिक्रमणे हटविणे, आवश्यक तेथे नियमित वाहतूक पोलीस तैनात ठेवणे, बायपास मार्गांचा पर्याय देणे, आवश्यक तेथे अवजड वाहतूक बंद करणे, वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करणे आवश्यक आहे. तेव्हाच पर्यटकांचा अधिक ओघ जिल्ह्यात वाढेल आणि पर्यटन व्यवसायाला व विकासाला चालना मिळेल.

# हिरवळ महाविद्यालयात पर्यावरण दिन साजरा

**माणगाव : प्रतिनिधी**

हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट कॉलेज ऑफ सायन्स (सीएसआईटी) महाडमध्ये जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात आला. या दिनाचे औचित्य साधत पर्यावरण जागरूकता आणि परिसर स्वच्छतेवर लक्ष केंद्रित करणारा एक प्रेरणादायी व प्रभावशाली कार्यक्रम हिरवळ महाविद्यालयात आयोजित करण्यात आला होता.

प्राचार्य सुदेश कदम यांनी आपल्या मनोगतात पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व आणि शाश्वत बदल घडवून आणण्यासाठी विद्यार्थ्यांची भूमिका अधोरेखित केली. आज आपण करीत असलेली प्रत्येक छोटी कृती उद्या अधिक हिरवीगार आणि आरोग्यदायी करण्यासाठी आपण समर्पण आणि दृढनिश्चयाने आपल्या पर्यावरणाचे रक्षण करण्याची शपथ घेऊया, असे आवाहन केले.



जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधत महाविद्यालयीन विद्यार्थी व शिक्षकांनी कॅम्पस स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील संपूर्ण परिसर स्वच्छ करून हिरवेगार वातावरण राखण्यासाठी आपली बांधिलकी दाखवली. या उपक्रमाने कॅम्पसचे केवळ सुशोभीकरण न होता पर्यावरण संवर्धनाप्रती विद्यार्थ्यांची जबाबदारीची भावनाही निर्माण केली.

हिरवळ एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष किशोर धारिया यांनी या उत्सवाविषयी आपले विचार व्यक्त करताना पर्यावरणीय उपक्रमांसाठी ट्रस्टच्या वचनबद्धतेवर भर दिला. जागतिक पर्यावरण दिन हा निसर्गाप्रती असलेल्या आपल्या कर्तव्याची आठवण करून देणारा आहे, असे विचार मांडले.

महाविद्यालयात आम्ही आमच्या विद्यार्थ्यांमध्ये आणि समुदायामध्ये पर्यावरणविषयक चेतना वाढवण्यासाठी समर्पित आहोत, असेही ते म्हणाले.

ट्रस्टच्या संचालिका सोनाली धारिया यांनी शाश्वत भविष्य घडवण्यासाठी पर्यावरण शिक्षण महत्त्वाचे आहे. अशा उपक्रमांद्वारे, आमच्या विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणीय जागरूकता व भावना निर्माण करण्याचा आमचा हेतू आहे, असे मत व्यक्त केले.

ट्रस्टच्या मुख्य सल्लागार डॉ. संध्या कुलकर्णी यांनी पर्यावरण जागृतीच्या व्यापक प्रभावावर प्रकाश टाकला. जागतिक पर्यावरण दिन साजरा करून आम्ही सर्व जीवसृष्टीतील परस्परसंबंध आणि पर्यावरणीय कृतीची तातडीची गरज ओळखणाऱ्या जागतिक चळवळीत योगदान देत आहोत, असे मत मांडले.

या वेळी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात पर्यावरणीय समतोल राखण्यासाठी विविध घोषणा देऊन परिसरात चैतन्य निर्माण केले होते.

# माणगावात नेत्रतपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव येथे शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल आणि उद्योजक विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट माणगाव यांच्या वतीने १२ जून रोजी सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करण्यात आले आहे. जुने एसटी स्टँड येथे हे शिबिर होणार आहे.

या शिबिरात मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी येणाऱ्या रुग्णांनी सोबत आधार कार्ड व रेशन कार्ड याची झेरॉक्स प्रत आणावी तसेच मधुमेहाची व रक्तदाबाची औषधे सुरु असल्यास तीदेखील घेऊन यावीत. रुग्णाला शस्त्रक्रियेसाठी जाण्याची, राहण्याची, जेवणाची व परत आणून सोडण्याची मोफत सोय करण्यात आली आहे. शिबिरात सहभागी होणाऱ्या नेत्ररुग्णांनी नावनोंदणीकरिता विधिता मनीष मेथा (८६९८७४०६४०), सुप्रिया संतोष शिंदे (९०४९६६५५९८) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

# बंदी असूनही श्रीवर्धनमध्ये मच्छीमारी बोटी समुद्रात

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

दरवर्षीप्रमाणे यंदाही १ जून ते ३१ जुलै या दोन महिन्यांच्या कालावधीसाठी शासनाने मच्छीमारीसाठी बंदी घातलेली आहे. या काळात पावसाळा असल्याने समुद्र खवळलेला असतो. त्याचप्रमाणे मच्छीचा या वेळी प्रजनन काळ असल्याने या दिवसांमध्ये मासेमारी केल्यास मासळीचे प्रमाण कमी होण्याची शक्यता नाकारता येत नाही, मात्र तरीही श्रीवर्धन येथील समुद्रामध्ये काही मोठ्या बोटी मच्छीमारी करताना दिसत आहेत.

समुद्र अद्याप पूर्णपणे खवळलेला नसल्यामुळे शासनाची मासेमारीची बंदी झुगारून काही बोटी मच्छीमारी करीत आहेत. अलिबाग येथील मत्स्य व्यवसाय विभागाने याकडे लक्ष देऊन त्या बोटमालकांवर कारवाई करावी, अशी मागणी अन्य मच्छीमारांकडून करण्यात येत आहे.



# बांगलादेशाचा श्रीलंकेवर रोमहर्षक विजय

**डल्लास : वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषकात बांगलादेश संघाने पहिल्यांदाच श्रीलंकेचा पराभव केला आहे. बांगलादेशचा सर्वांत अनुभवी खेळाडू महमदुल्लाहने संघाला एक षटक आणि दोन विकेट्स राखून मोठा विजय मिळवला आहे. श्रीलंकेनेही चांगली टक्कर दिली पण धावसंख्या कमी असल्याने संघाला हार मानावी लागली. श्रीलंकेने प्रथम फलंदाजी करताना नऊ बाद १२४ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात बांगलादेशने आठ बाद १२५ धावा करीत रोमहर्षक विजय मिळवला.



अखेरच्या चार षटकांमध्ये बांगलादेशला १७ धावांची आवश्यकता होती. १६७व्या षटकात पाथिरानाने शाकिबला बाद करीत तीन धावा दिल्या, तर १८व्या षटकात नुवान तुषाराने कमाल करीत दोन विकेट्स मिळवत बांगलादेशच्या धावांना ब्रेक लावला आणि अवघ्या तीन धावा दिल्या. आता शेवटच्या दोन षटकात विजयसाठी ११ धावांची आवश्यकता होती. शनाका गोलंदाजीसाठी आला आणि त्याच्या १९व्या षटकातील पहिल्याच चेंडू त्याने फुल टॉस टाकल्याने महमुदुल्लाह षटकार खेचत सामना आपल्या बाजून वळवला. तुषारा आणि पाथिरानाच्या षटकानंतर बांगलादेशला धावा करणे अवघड होते, पण या षटकाराने बांगलादेशला मोठा विजय आपल्या नावे करता आला.

१२५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या बांगलादेश संघाची सुरुवात फारशी खास झाली नाही. त्यांनी आपले दोन्ही सलामीवीर सहा धावांत गमावले. यानंतर लिटन दासने डावाची धुरा सांभाळली. त्याने ३८ चेंडूंत ३६ धावा केल्या आणि एका टोकाला पाय रोवून उभा राहत डाव सावरला. यानंतर तौहीद हृदयने आपल्या झंझावाती खेळीने दासला साथ दिली. या दोन्ही फलंदाजांच्या भागीदारीने सामना बांगलादेशकडे वळवण्यात मोठी भूमिका बजावली.

तौहीदने २००च्या स्ट्राईक रेटने फलंदाजी करताना केवळ २० चेंडूंत ४० धावा केल्या. हृदयनेही आपल्या खेळीत चार षटकार आणि एक चौकार लगावला. त्यानंतर श्रीलंकेने चांगले पुनरागमन केले, मात्र महमुदुल्लाहने षटकार ठोकत श्रीलंकेच्या आशा धुळीस मिळवल्या. महमुदुल्लाहने १६ धावांची नाबाद खेळी खेळली. श्रीलंकेकडून नुवान तुषाराने सर्वाधिक चार विकेट्स घेतल्या. कर्णधार वानिंदू हसरंगाने दोन, तर धनंजय डी सिल्वा आणि मथिशा पाथिराना यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

# युग म्हात्रेची जलतरण स्पर्धेत चमक

## रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचा खेळाडू

**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

ठाणे येथे झालेल्या पहिल्या राज्यस्तरीय किक बोर्ड आणि फिन्स स्विमिंग चॅम्पियनशिपमध्ये उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सच्या युग राजतुल म्हात्रे याने सुयश प्राप्त केले आहे.




स्टार फिश स्पोर्ट्स फाउंडेशनच्या वतीने स्व. श्रीमती जानुबाई बाबू गवळी यांच्या स्मरणार्थ पहिली राज्यस्तरीय किक बोर्ड आणि फिन्स स्विमिंग चॅम्पियनशिप २०२४ ही स्पर्धा ठाणे येथील मारोतराव शिंदे स्विमिंग पूलमध्ये आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत मोरू नारायण म्हात्रे विद्यालयातील विद्यार्थी आणि रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचा जलतरणपटू युग म्हात्रे याने नऊ वर्षांखालील मुलांच्या गटात सुवर्ण, रौप्य आणि कांस्य अशा तीनही पदकांची कमाई केली.

या यशाबद्दल रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे संचालक रवींद्र भगत तसेच व्यवस्थापक प्रणित गोंधळी आणि शामनाथ पुंडे यांनी युगचे कौतुक व अभिनंदन केले.

# अमेरिकेकडून झालेल्या पाकिस्तानच्या पराभवानंतर वसीम अक्रम संतापला

**कराची : वृत्तसंस्था**



पाकिस्तानला आपल्या सलामीच्या सामन्यात अमेरिकेकडून पराभव स्वीकारावा लागला. या पराभवानंतर पाकिस्तानचे माजी खेळाडू आपल्या संघावर सडकून टीका करीत आहेत. पाकिस्तानचा दिग्गज गोलंदाज वसीम अक्रमने बाबर आझमच्या संघावर बोचरी टीका केली.

पाकिस्तानातील वृत्तवाहिनीवर बोलताना अक्रमने संताप व्यक्त केला. तो म्हणाला की, हार आणि जीत हा खेळाचा एक भाग आहे, पण शेवटच्या चेंडूपर्यंत संघर्ष करणे महत्त्वाचे आहे. पाकिस्तान क्रिकेटसाठी हा सर्वांत वाईट दिवस होता. आता पाकिस्तानला सुपर ८मध्ये स्थान मिळवण्यासाठी खूप संघर्ष करावा लागेल, कारण पुढचा सामना भारत मग आयर्लंड आणि कॅनडा या संघांसोबत होणार आहे.

पाकिस्तानला कॅनडासारख्या नवख्या संघाचा ११ तारखेला सामना करायचा आहे. शुक्रवारी झालेल्या सामन्यात आयर्लंडने नाणेफेक जिंकून कॅनडाला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केले. त्यांनी निर्धारित २० षटकांत ७ बाद १३७ धावा केल्या. कॅनडाने दिलेल्या या छोट्या आव्हानाचा पाठलाग करताना आयर्लंडला अपयश आले. ते निर्धारित २० षटकांत ७ बाद केवळ १२५ धावा करू शकले आणि कॅनडाने १२ धावांनी विजय मिळवला. धिम्या गतीने धावा केल्यानंतर कॅनडाच्या गोलंदाजांनी सांघिक कामगगिरी करत विजय साकारला. हा त्यांच्या ट्वेंटी-२० विश्वचषकातील पहिलाच विजय आहे.

दरम्यान, पाकिस्तान आणि कॅनडा यांच्यात ११ तारखेला सामना होणार आहे. याआधी पाकिस्तानी संघ बलाढ्य भारताविरूद्ध खेळेल. पाकिस्तानला आपल्या सलामीच्या सामन्यात अमेरिकेविरूद्ध पराभव पत्करावा लागला. त्यामुळे शेजाऱ्यांच्या अडचणीत वाढ झाली.

# न्यूझीलंडला हरवून अफगाणिस्तानची ऐतिहासिक कामगिरी

**गयाना : वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषक स्पर्धेत अफगाणिस्तान संघाने शानदार फिरकी गोलंदाजीच्या जोरावर न्यूझीलंडवर ८४ धावांनी मात करीत इतिहास रचला. टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये अफगाणिस्तानचा न्यूझीलंडविरुद्धचा हा पहिला विजय आहे. अफगाणिस्तानने संघाने प्रथम फलंदाजी करताना न्यूझीलंडसमोर १६० धावांचे लक्ष्य ठेवले. या लक्ष्याचा पाठलाग करताना किवी संघ ७५ धावांत गारद झाला. त्यांना पूर्ण २० षटकेही खेळता आली नाहीत. या विजयात राशिद खान आणि फजलहक फारुकीने महत्त्वाची भूमिका निभावली.



अफगाणिस्तानविरुद्धच्या सामन्यात न्यूझीलंडची सुरुवात चांगली झाली नाही. या सामन्यात फिल लन खाते न उघडता पॅव्हेलियनमध्ये परतला. यानंतर डेव्हॉन कॉनवे आणि केन विल्यमसन यांनाही मोठी खेळी करता आली नाही. अफगाण गोलंदाज फजलहक फारुकीसमोर न्यूझीलंडचे फलंदाज हतबल दिसत होते आणि त्यांना मुक्तपणे फटके मारता आले नाहीत. न्यूझीलंडकडून ग्लेन फिलिप्सने सर्वाधिक १८ धावा केल्या. मॅट हेन्रीने १२ धावा केल्या. डॅरिल मिशेल पाच, केन विल्यमसन नऊ, मार्क चॅपमन चार, मायकेल ब्रेसवेल शून्य, ग्लेन फिलिप्स १८, मिचेल सँटनर चार, मॅट हेन्री १२, लॉकी फर्ग्युसन दोन धावा करून बाद झाले. त्याचवेळी ट्रेंट बोल्ट तीन धावा करून नाबाद राहिला.

या सामन्यात अफगाणिस्तानच्या गोलंदाजांनी धुमाकूळ घातला. फजलहक फारुकी आणि राशिद खानने प्रत्येकी चार, तर मोहम्मद नबीने दोन विकेट घेतल्या. न्यूझीलंडचा संपूर्ण संघ १५.२ षटकांत ७५ धावांत सर्वबाद झाला. न्यूझीलंडने हा सामना ८४ धावांनी गमावला असून हा त्यांचा टी-२० विश्वचषकातील सर्वांत मोठा पराभव आहे. यापूर्वी २०१४च्या टी-२० विश्वचषक स्पर्धेत न्यूझीलंड संघ श्रीलंकेविरुद्ध ५९ धावांनी पराभूत झाला होता.

तत्पूर्वी नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करताना अफगाणिस्तानने २० षटकांत सहा गडी गमावून १५९ धावा केल्या होत्या. या सामन्यात रहमानुल्ला गुरबाज आणि इब्राहिम झद्रान यांनी संघाला चांगली सुरुवात करून दिली. दोघांमध्ये पहिल्या विकेटसाठी १०२ धावांची स्फोटक भागीदारी झाली. मॅट हेन्रीने संघाला पहिला धक्का दिला. त्याने झाद्रानला बोल्ड केले. त्याला तीन चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने ४४ धावा करता आल्या. यानंतर हेन्रीने तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या अजमतुल्ला ओमरझाईला आपला बळी बनवले. तो २२ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला.

या सामन्यात सलामीवीर रहमानउल्ला गुरबाजने स्फोटक फलंदाजी केली. त्याने ५६ चेंडूंत ८० धावा केल्या. यादरम्यान त्याने १४२.८५च्या स्ट्राईक रेटने पाच चौकार आणि तेवढेच षटकार मारले. या सामन्यात राशिद खान सहा धावा करून बाद झाला, तर गुलबदिन नायबला भोपळाही बाद फोडता आला नाही. करीम आणि नजीबुल्लाह प्रत्येकी एक धावेवर नाबाद परतले. किवी संघाकडून बोल्ट आणि हेन्रीने प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या, तर लॉकी फर्ग्युसनला एक विकेट मिळाली.

# पाकिस्तानच्या हॅरिस रौफने चेंडूसोबत छेडछाड केल्याचा आरोप

## टी-२० वर्ल्डकपमध्ये खळबळ

**न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**

विश्वचषक स्पर्धेच्या साखळीत पाकिस्तानला सलामीलाच धक्कादायक पराभवाला सामोरे जावे लागले आहे. यजमान अमेरिकेनं बलाढ्य पाकिस्तानचा सुपर ओव्हरमध्ये पाच धावांनी पराभव करून नवा इतिहास घडवला. पाकिस्तानला २० षटकांत ७ बाद १५९ धावांवर रोखल्यानंतर अमेरिकेनेही २० षटकांत ३ बाद १५९ धावा केल्या. यानंतर सुपर ओव्हरमध्ये बिनबाद १८ धावा केल्यानंतर अमेरिकेने पाकिस्तानला १ बाद १३ धावांवर रोखले.



पाकिस्तानला पहिल्याच लढतीत पराभव स्वीकारावा लागल्याने त्यांची सुपर-८ वाट खडतर झाली आहे. अमेरिकेच्या नवख्या संघानं अनुभवी पाकिस्तानला सुपर ओव्हरमध्ये पराभूत केले. यामुळे पाकिस्तानच्या टी-२० वर्ल्डकपमधील मोहिमेला फटका बसण्याची शक्यता आहे, मात्र याचदरम्यान एक धक्कादायक माहिती समोर येत आहे. पाकिस्तानी गोलंदाज हॅरिस रौफ याच्यावर चेंडूशी छेडछाड केल्याचा गंभीर आरोप आता करण्यात येत आहे.

अमेरिकेच्या वरिष्ठ राष्ट्रीय क्रिकेट संघाचा सदस्य रस्टी थेरॉन याने हॅरिस रौफवर चेंडूसोबत छेडछाड केल्याचा आरोप केला आहे. थेरॉनने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर लिहिले की, आयसीसी, पाकिस्तानी गोलंदाज चेंडूशी छेडछाड करत नाही असा समज आम्ही करून घेऊ का? दोन षटकांपूर्वी बदललेला चेंडू रिव्हर्स कसा होऊ शकतो? हॅरिस रौफने त्याच्या नखाने चेंडू कुरतडला आहे आणि त्याचे पुरावे तुम्हाला चेंडूवर दिसू शकतील. अमेरिकेच्या टीमकडून याबाबत कोणतीच अधिकृत तक्रार करण्यात आलेली नाही, परंतु रौफवर करण्यात आलेला आरोप गंभीर असल्याचे बोलले जात आहे.

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील लढत ९ जूनला होणार आहे. भारत या गटातील सर्वांत मजबूत संघ आहे. भारताने पहिलं स्थान मिळवून सुपर-८मध्ये प्रवेश केल्यास पाकिस्तानला काही करुन दुसरे स्थान मिळवावे लागेल. पाकिस्ताननं राहिलेल्या तीन मॅच जिंकल्या, तर त्यांचे सहा गुण होतील, मात्र त्याचवेळी अमेरिकेला पुढील सर्व मॅचेसमध्ये पराभूत व्हावे लागेल.

टी-२० विश्वचषकात अमेरिकेने आतापर्यंत ज्या दोन मॅच जिंकल्या आहेत त्या दमदार कामगिरी करत जिंकल्या आहेत. अमेरिकेच्या संघात भारतीय, वेस्ट इंडिज, दक्षिण आफ्रिका, न्यूझीलंड आणि पाकिस्तानी वंशाचे खेळाडू आहेत. हे खेळाडू कोणत्याही संघापुढं तगडे आव्हान निर्माण करु शकतात. अमेरिकेने नुकत्याच झालेल्या तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेत बांगलादेशला पराभूत केले होते. कॅनडा आणि पाकिस्तानला टी-२० वर्ल्डकपमध्ये अमेरिकेने पराभूत केले आहे. भारतीय संघापुढेही ते तगडे आव्हान निर्माण करू शकतात. त्यामुळे भारतीय संघाला अमेरिकेविरुद्ध सतर्क राहण्याची गरज आहे.

दरम्यान, पाकिस्तानचा खेळाडू हॅरिस रौफवर चेंडूसोबत छेडछाड केल्याचा आरोप अमेरिकेच्या वरिष्ठ राष्ट्रीय क्रिकेट संघाचा सदस्य रस्टी थेरॉनने केला आहे. आता यावर हॅरिस, पाकिस्तानी कर्णधार किंवा संघ व्यवस्थापन काय उत्तर देणार हे पाहणे महत्त्वाचे असेल.



# द्रविड, आगरकरकडून डॉ. आंबेडकर यांना अमेरिकेत अभिवादन

**न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाचे मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड आणि निवड समिती प्रमुख अजित आगरकर या दोघांनी कोलंबिया विद्यापीठ या ठिकाणी जाऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन केले.

भारतीय संघाने टी-२० विश्वचषक स्पर्धेत आयर्लंडवर विजय मिळवला. यानंतर काहीशा रिलॅक्स मूडमध्ये असलेले मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड आणि निवड समितीचे प्रमुख अजित आगरकर यांनी भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना न्यूयॉर्कमध्ये आदरांजली वाहिली. कोलंबिया विद्यापीठातले या दोघांचे फोटो व्हायरल होत आहेत. विशाल मिश्रा नावाच्या एका नेटकऱ्याने हे फोटो पोस्ट केले आहेत.

# अफगाणिस्तानच्या सलामी फलंदाजांकडून सलग दुसऱ्या सामन्यात शतकी भागिदारी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषक स्पर्धेत अफगाणिस्तानने न्यूझीलंडवर ८४ धावांनी मात करत टी-२० क्रिकेटमधील ऐतिहासिक विजय नोंदवल आहे. टी-२० क्रिकेटच्या इतिहासात अफगाणिस्तानचा हा न्यूझीलंडविरुद्धचा पहिला विजय ठरला आहे. अफगाणिस्तानकडून रहमानउल्ला गुरबाज आणि इब्राहिम झद्रान यांनी पहिल्या विकेट्ससाठी १०३ धावांची भागीदारी केली. दोघांनी या भागीदारीच्या जोरावर अनेक पराक्रम केले आहेत.

रहमानउल्ला गुरबाज आणि इब्राहिम झाद्रान यांनी युगांडाविरुद्धच्या सामन्यात १५४ धावांची सलामी दिली होती. आता या दोघांनी न्यूझीलंडविरुद्धही शतकी भागीदारी केली आहे. गुरबाज-झाद्रान ही जोडी टी-२० विश्वचषकात सलग दोन सामन्यांमध्ये शतकी भागीदारी करणारी दुसरी जोडी ठरली आहे. याआधी २०१४च्या टी-२० विश्वचषकात रोहित शर्मा आणि विराट कोहली यांनी सलग दोन सामन्यांमध्ये शतकी भागीदारी केली होती. आता गुरबाज आणि झद्रान यांनी या खेळाडूंची बरोबरी करीत दहा वर्षांच्या जुन्या विक्रमाची पुनरावृत्ती केली आहे.

मोहम्मद रिझवान आणि बाबर आझम यांच्या नावावर टी-२० विश्वचषकाच्या इतिहासात सर्वाधिक शतकीय सलामी भागीदारी करण्याचा विक्रम आहे. या दोघांनी टी-२० विश्वचषकात सलामी देताना तीनदा शतकीय भागीदारी केली आहे. ॲडम गिलख्रिस्ट आणि मॅथ्यू हेडन, डेव्हिड वॉर्नर आणि शेन वॉटसन, रहमानउल्ला गुरबाज आणि इब्राहिम झाद्रान यांनी टी-२० विश्वचषकात सलामी देतान प्रत्येकी दोनदा शतकी भागीदारी केली आहे.

# राशिद खानने रचला इतिहास

**गयाना** : टी-२० विश्वचषकामध्ये अफगाणिस्तान संघाने बलाढ्य न्यूझीलंड संघाचा पराभव करीत मोठा उलटफेर केला. कर्णधार राशिद खानने या ऐतिहासिक विजयात महत्त्वाची भूमिका बजावत इतिहास रचला. राशिद या कामगिरीसह मोठी कामगिरी करणारा टी-२० मधील पहिला कर्णधार ठरला आहे.

या सामन्यात राशिद खानने आपल्या उत्कृष्ट गोलंदाजीने १७ वर्ष जुना विक्रम मोडीत काढला. त्याने चार षटकांत केवळ १७ धावा देत चार महत्त्वपूर्ण विकेट घेतल्या आणि टी-२० विश्वचषकात सर्वोत्तम गोलंदाजी करणारा पहिला कर्णधार ठरला. राशिदने न्यूझीलंडचाच माजी कर्णधार डॅनियल व्हिटोरीचा विक्रम मोडला आहे. न्यूझीलंडच्या दिग्गज फिरकीपटूने २००७मध्ये झालेल्या टी-२० विश्वचषकाच्या पहिल्याच सत्रात भारताविरुद्ध २० धावांत चार विकेट घेतल्या होत्या. आता या यादीत राशिद खानचे नाव पहिल्या क्रमांकावर आले आहे.










दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com